स्वादमय सकाळचा नाश्ता
मिसळपाव, वडासांबर, इडलीसांबर, उडिदवडासांबर, मसालाडोसा, उपमा, उत्तपा, शीरा पुरी भाजी,
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी. रोड, अहमदनगर. फोन : ०२४१ २३२७०६०, ९८५०७९९८५०


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १०.०१.२०२५ | अंक नं. २६३ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

गोड गोड हुरडा गरम गरम वनभोजन
सहकुटुंब मित्रपरिवारासह निसर्गाचा मनमुराद आनंद घेऊया
२५ पेक्षाही अधिक मनोरंजनाची साधने व इतर बरेच काही
संपूर्ण परिवारासह साईबनमध्ये हुरडा पार्टी
आकर्षक पॅकेज उपलब्ध आजच संपर्क करा
वेळ : सकाळी ९ ते सायं ५
डॉ. कांकरियांचे साईबन
साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी. मागे, अहमदनगर
हेल्पलाईन - 9112288622
9850500905 / 9096639368

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# आणखी एका व्यापाऱ्याच्या जमिनीवर ‘अतिक्रमण’ करत उभारल्या ‘झोपड्या’

## मालकाला दमबाजी, ८ ते १० महिलांवर गुन्हा दाखल

नगर – नगर शहरातील व्यापाऱ्याच्या वाटेफळ (ता.नगर) गावच्या शिवारात असलेल्या शेत जमिनीत अनोळखी ८ ते १० महिलांनी अतिक्रमण करत कापडी झोपड्या उभारल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत विचारणा करण्यास गेलेल्या शेतमालकालाच दमबाजी करण्यात आली. या प्रकरणी त्या अनोळखी महिलांवर नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


याबाबत अनिल वालचंद गांधी (वय ६०, रा.सिताबन लॉन शेजारी, कोठी रोड) यांनी ९ जानेवारी रोजी दुपारी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा नगर शहरात धान्याचा व्यापार असून त्यांची नगर तालुक्यातील वाटेफळ गावच्या शिवारात गट नंबर ६० मध्ये शेतजमीन आहे. फिर्यादी गांधी हे गुरुवारी सकाळी शेत जमिनीत फेरफटका मारण्यासाठी गेले असता त्यांना त्यांच्या शेतात कापडी झोपड्या (पाल) उभारल्याचे दिसून आले. त्यांनी तेथे जावून पाहणी केली असता तेथे ८ ते १० अनोळखी महिला होत्या. त्यांना गांधी यांनी ‘माझ्या शेतात झोपड्या का बांधल्या?’ अशी विचारणा केली असता, त्या महिलांनी गांधी यांना दमबाजी सुरु केली. ‘आम्ही येथेच राहणार आहोत, ही जागा आमची आहे. आमच्या नादी लागू नका’, अशी धमकीही दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अनोळखी ८ ते १० महिलांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३२९ (१) (३), ३५२, ३५१ (२) (३) गुन्हा दाखल केला असून पुढील तपास स.फौ. रमेश गांगुर्डे हे करीत आहेत.

### या ताबेमारांपासून व्यापाऱ्यांना न्याय मिळणार का?

शहरातील व्यापाऱ्यांच्या नगर तालुक्यात असलेल्या जमिनींवर एका विशिष्ट समाजाच्या लोकांकडून ताबेमारी सुरु आहे. गेल्या महिनाभरात याबाबतचा तिसरा गुन्हा नगर तालुका पोलिस ठाण्यात दाखल झाला आहे. यापूर्वी वाटेफळ (ता.नगर) गावच्या शिवारात असलेल्या संतोष फुलचंद गांधी (वय ५६, रा.शांती विहार कॉलनी, सारसनगर) यांच्या मालकीच्या शेतजमिनीत अनोळखी महिलांनी अतिक्रमण करून पाल ठोकल्याचा प्रकार ५ डिसेंबर २०२४ रोजी समोर आला होता. याबाबत संतोष गांधी यांच्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला आहे. त्यानंतर ६ जानेवारीला बाबुर्डी घुमट (ता.नगर) गावच्या शिवारात सुदर्शन दिलीप डुंगरवाल (वय ४२, रा.सिताबन लॉन्स जवळ, कोठी रोड, मार्केट यार्ड) यांच्या मालकीच्या असलेल्या शेतजमिनीत त्याच विशिष्ट समाजाच्या ४ ते ५ पुरुषांनी ताबा मारत डुंगरवाल यांना धमकावल्याचा प्रकार घडला होता. त्याचाही गुन्हा दाखल आहे.

### पोलिस अधीक्षकांच्या आश्वासनाचे काय झाले?

अहिल्यानगर शहरातील व्यापाऱ्यांच्या जमिनींवर ताबेमारी करणाऱ्या विशिष्ट समाजाच्या लोकांवर कारवाई करावी, या मागणीसाठी आ.संग्राम जगताप यांच्यासह व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाने पोलिस अधिक्षक राकेश ओला यांची भेट घेत निवेदन दिले होते. यावेळी अधिक्षक ओला यांनी याबाबत तातडीने कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र त्या नंतरही हे प्रकार सुरूच आहेत. पोलिस अधीक्षकांशी झालेल्या भेटी नंतरही २ गुन्हे दाखल झाले असल्याने पोलिस अधीक्षकांच्या आश्वासनाचे काय झाले? असा सवाल उपस्थित होत आहे. गुन्हे दाखल झाले पण कारवाई होत नसल्याने या ताबेमारी करणाऱ्या लोकांना पोलिसांचा किंवा कायद्याचा धाकच उरला नाही काय? आम्ही कष्ट करून पैसे कमवायचे, त्यातून मालमत्ता खरेदी करायच्या आणि या लोकांनी त्यावर आयता ताबा मारायचा, याला काय म्हणायचे. हे कायद्याचे राज्य आहे का? असा संतप्त सवाल व्यापारी वर्गासह सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत.

भावपूर्ण श्रद्धांजली!


स्व. अशोकराव (आण्णा) भुजबळ
स्व. दि. ०९/०१/२०२५
स्व. संजय (नाना) सत्रे
स्व. दि. ०९/०१/२०२५
ज्योत अनंतात विलिन झाली, स्मृती आठवणींनी दाटुन आली
भाव सुमनांची ओंजळ भरुनी, वाहतो आम्ही श्रध्दांजली...
दुःखांकित
हॅलो ग्रुप
सर्व मित्र परिवार
अहिल्यानगर, पुणे, नाशिक

# बुरखाधारी महिलेने सराफाच्या दुकानातून चोरली सोन्याची अंगठी

## खरेदीच्या बहाण्याने आली आणि हातचलाखी करून गेली, घटना सीसीटीव्हीत कैद

नगर – सोने खरेदी करण्याच्या बहाण्याने आलेल्या बुरखाधारी अनोळखी महिलेने सेल्समनची नजर चुकवून १२.०९ ग्रॅम वजनाची १ लाख ५ हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी चोरुन नेल्याची घटना जुन्या वसंत टॉकीज रोडवरील चंदुकाका ज्वेलर्स दुकानात घडली. दुकानातील सीसीटीव्ही फुटेज पाहिल्यावर चोरीची ही घटना निदर्शनास आली आहे.

या बाबत दुकानाचे व्यवस्थापक राजेंद्र नेमीचंद सरनोत (रा. स्वस्तिक रेसिडेन्सी, भवानीनगर) यांनी गुरुवारी (दि.९ जानेवारी) दुपारी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व दुकानातील कर्मचारी यांनी दुकानातील सर्व सोन्याच्या वस्तुंचा पडताळा (स्टॉक) घेतला असता त्यात एक अंगठी कमी असल्याचे दिसले. त्यामुळे त्यांनी दुकानातील सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता २ जानेवारी रोजी दुपारी साधारणत: सव्वा तीन वाजण्याच्या सुमारास १ बुरखा घातलेली महिला सोन्याची अंगठी खरेदी करण्याकरीता दुकानात आली.

त्यावेळी दुकानातील सेल्समन महेश लोखंडे याने तिचे समोर वेगवेगळ्या सोन्याचे अंगठ्या दाखवल्या. त्यावेळेस त्या अनोळखी महिलेने ट्रे मधुन काही सोन्याच्या अंगठ्या हातात घेवुन आंगठ्यांचा भाव विचारला, काही वेळ सोन्याच्या अंगठ्या पाहून पसंद न पडल्याचे कारणास्तव ती दुपारी ३.४५ वाजता दुकानातून निघुन गेली. परंतु त्या महिलेच्या हालचाली संशयास्पद वाटत असल्याने तसेच त्या महिलेने तोंडाला बुरखा बांधुन व डोळ्यावर चष्मा लावुन सोन्याच्या अंगठ्या पसंद न पडण्याच्या कारण सांगुन घाईघाईने निघुन गेली. हे संशयास्पद वाटल्याने सीसीटीव्ही फुटेज बारकाईने पाहिले असता त्या अनोळखी बुरखा घातलेल्या महिलेने हातचलाखी करुन त्या ट्रे मधील १ लाख ५ हजार रुपये किमतीची १२.०९ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी पैसे देता व बिल न घेता चोरी करुन घेवुन गेल्याचे दिसून आले.

त्यामुळे या प्रकरणी व्यवस्थापक राजेंद्र सरनोत यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी बुरखाधारी अनोळखी महिले विरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (अ) अन्वये चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# शेअर ट्रेडिंगमध्ये सेवानिवृत्त व्यक्तीची ५० लाखांची फसवणूक

नगर – शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक केल्यास अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून नगर जिल्ह्यातील एका ६२ वर्षीय सेवानिवृत्त व्यक्तीची एका अनोळखी महिलेने ५० लाख १ हजार ३७९ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. विकास वसंतराव कुलकर्णी (वय ६२, रा. शिर्डी, ता. राहाता) असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी त्यांनी गुरुवारी (दि.९ जानेवारी) सायंकाळी नगरच्या सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादी हे सेवानिवृत्त असून शिर्डी येथे राहतात. एक दिवस ते मोबाईल वर व्हॉट्सअप पाहत असताना एका ग्रुपवर त्यांना शेअर ट्रेडिंग मध्ये गुंतवणूक कशी करायची, त्यातून अधिक नफा कसा मिळवायचा याबाबतची लिंक आली व त्यावर त्यांनी क्लिक केले असता त्यांचा कांचन नावाच्या एका महिलेचा नंबर वर संपर्क झाला. त्या कांचन नावाच्या महिलेने फिर्यादी यांच्याशी व्हॉट्सअप वर शेअर ट्रेडींग बाबत माहिती सांगून तिने त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर तिने सांगितल्याप्रमाणे फिर्यादी कुलकर्णी यांनी त्यांच्या बँक खात्यातून दि.१२ एप्रिल २०२४ ते १७ मे २०२४ पर्यंत ऑनलाईन ५० लाख १ हजार ३७९ रुपयांची रक्कम पाठवली.

दरम्यान, त्यानंतर फिर्यादी यांनी कांचन हिला गुंतवणूक केलेल्या रक्कमेचा परतावा मिळण्यासाठी विचारणा केली असता तिने उडवा उडवीची उत्तरे देत त्यांच्याशी संपर्क बंद केला. अनेक वेळा संपर्क करूनही संपर्क न झाल्याने आणि गुंतवलेले पैसे परत न मिळाल्याने कांचन नावाच्या या अनोळखी महिलेने आपली फसवणूक केल्याचे फिर्यादी यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी गुरुवारी (दि.९ जानेवारी) सायंकाळी नगरमध्ये येवून सायबर पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलिसांनी कांचन नावाच्या महिलेविरोधात भा.दं. वि. कलम ४१९, ४२० सह आयटी ॲक्ट कलम ६६ (डी) नुसार गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलिस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम हे करीत आहेत.

॥ चैतन्य ॥
काळे फार्म हुरडा पार्टी केंद्र
नगर-पुणे हायवेपाच (मु. पो. चास, ता.जि.अ.नगर)
कोवळा-लुसलुशीत हुरडा, खमंग चटण्या, दही, गुळ, गोडी शेव, रेवडी, उसाचा रस, चहा नाष्टा शेतावरचे गावरान जेवण.. निसर्गरम्य चिकू, पेरुची बाग..
संपर्क : विजय काळे
7773934398
9503824398
हुरडा २५० रु. किलो


११ वे पुण्यस्मरण
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली!
स्व. सिमरतमलजी हिरालालजी गांधी (भाऊसा)
स्व. दि.१०/१/२०१४
भाग्यवान आम्ही पितृछत्र ऐसे लाभले, आशीर्वादाने आपल्या जीवन धन्य झाले...
अजूनही वाटते तुम्ही सोबत आहात... पाठीवरुनी हात मायेचा फिरवित आहात...
श्रीमती रमला गांधी
सौ. जयश्री — प्रकाश गांधी
सौ. साधना — राजेंद्र गांधी
सौ. हेमा — रविकिरण गांधी
सौ. निकिता — विशाल गांधी
श्रीमती मीना अजित बोरा
गांधी परिवार सरस उद्योग समुह अहमदनगर

# बोल्हेगावात छताचा पत्रा कापून दुकानात चोरी; ११ मोबाईल लंपास; २ चोरटे सीसीटिव्हीत कैद

नगर – दुकानाच्या छताचा पत्रा कापून दोन अनोळखी चोरट्यांनी आत प्रवेश करून आतील सामानाची उचका पाचक करून विविध कंपन्याचे ६५ हजार रुपये किमतीचे ११ मोबाईल चोरून नेल्याची घटना बोल्हेगाव, येथील रेणुकानगर, आंबेडकर चौक येथे भोलेनाथ मोबाईल शॉपी नावाचे दुकानात घडली. ही चोरी करणारे २ चोरटे सीसीटीव्हीत कैद झाले आहेत.

या बाबतची माहिती अशी की शुभम बाळु मिसाळ, (वय २४, रा.बोल्हेगाव, आदेश लॉन जवळ, अ.नगर) याचे बोल्हेगाव, येथील रेणुकानगर, आंबेडकर चौक येथे भोलेनाथ मोबाईल शॉपी नावाचे लोखंडाच्या पत्र्याचे दुकान आहे. या दुकानामध्ये नवीन

(पुढील मजकूर पान २ वर)

THE GREATEST EVER DISCOUNT OFFER
An ISO 9001:2015 Certified DISHA COMPUTER INSTITUTE Experts In Computer Training
BIG DISCOUNT DAYS
9th to 18th Jan

Any Course Just in 1450/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST | 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP | ILLUSTRATOR IN DESIGN, C PROGRAMMING, C++ | CANVA, CHAT GPT, BANKING, TAXATION
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, A.agar — 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, A.nagar. — 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, A.nagar. — 7447761769

फ्रेश स्टॉक
महावीर मॉल... स्वस्त परंतु चांगले कपडे खरेदी करणाऱ्या ग्राहकांनीच कृपया मॉलला भेट द्यावी.
आली थंडी
जेन्ट्स-लेडीज स्वेटर, जर्किन, हुडी, अप्पर, मफलर, हँड ग्लोज, उलन कॅप सर्व साईजमध्ये आणि होलसेल दरात..
इंपोर्टेड ब्लँकेट ४०० रु. किलो प्रमाणे
मार्केट पेक्षा वेगळ पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँक जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात | दिनांक : 09 जानेवारी ते 16 जानेवारी 2025
KAHO NA PYAAR HAI 06:30 PM
SANGEET MANAPMAA 01:45 PM I 07:15 PM
Y J Y D 08:30 PM I 03:15 PM
MUFASA - 3D 05:00 PM
GAME CHANGER 08:00 AM I 11:00 AM 02:00 PM I 07:25 PM 10:30 PM
PUSHPA-2 11:30 AM 09:45 PM
FATEH (Hindi) 08:45 AM I 11:15 AM I 04:45 PM I 10:15 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX SMART THEATRE
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनो चला वाचनालयी

यंदाच्या नववर्षात चांगली प्रथा जोरात चालू आहे. पुस्तक आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देऊन विद्यार्थी, पालक सर्वप्रकारच्या वाचकांत उर्मी व प्रेरणा मिळावी म्हणून शासन आणि वाचनालय स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन चालू आहे.

१८३८ मध्ये स्थापित महाराष्ट्रातले पहिले सार्वजनिक वाचनालय असलेल्या अ.नगर जिल्हा वाचनालय व महा. शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी एक अभिनव उपक्रम राबवला असलून, दि. १५ जानेवारीपर्यंत विविध शाळेतील विद्यार्थ्यांना चितळेरोडवरील जिल्हा वाचनालयात भेट घडवून पुस्तकांची माहिती, ओळख करवून दिली जाते.

आजच्या मोबाईल व सोशल मिडीयाच्या दिवसांत खरे, शाश्वत व जीवनापयोगी




ज्ञान, अनुभव घ्यायचे असल्यास वाचनाला पर्याय नाही. याची महती विद्यार्थी दशेतच झाल्यास वाचनाची आवड होऊ शकते, वाढू शकते. आता तर ऑडीओबुक असतात. तरीपण पान उलगडतांना वाचतांना जीवनानंद घेता येऊ शकतो.



खरंतर पालक व शिक्षकांनी वेळोवेळी, निरंतर मुलांना वाचनासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. नुकतेच न्यू आर्टस् व सारडा कॉलेजमध्ये पुस्तक प्रदर्शन झालेत.

वाचन चळवळ समृद्ध करणाऱ्या अ.नगर जिल्हा वाचनालयाची परंपरा अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, ग्रंथपाल अमोल इथापे व त्यांचे सर्व सहकारी नेटाने पुढे नेत आहेत.

## बोल्हेगावात छताचा पत्रा कापून दुकानात चोरी

(पान १ वरुन)

व जुने मोबाईल खरेदी विक्रीचे कामकाज होते. ६ जानेवारी रोजी सकाळी नेहमीप्रमाणे त्याने दुकान उघडले व दिवसभर कामकाज करुन सांयकाळी दुकानाचे शटर व्यवस्थित लॉक करुन बंद केले. त्यानंतर मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास शुभम याच्या मोबाईलमध्ये सीसीटीव्हीचा अलार्म वाजला म्हणून त्याने उठुन पाहिले असता त्याला त्याच्या मोबाईलमध्ये दुकानात चोरी करताना एक जण दिसला.

त्यामुळे शुभम हा त्याच्या मित्रासह भोलेनाथ मोबाईल शॉपीकडे गेला असता तेथे त्याच्या दुकानातुन दोनजण पळुन जाताना दिसले. त्याने दुकानात जावुन पाहाणी केली असता, त्याला दुकानाच्या छताचा पत्रा कापलेला दिसला. दुकानात उचकापाचक झालेली दिसली. काऊंटरला ठेवलेले विविध कंपनीचे मोबाईल मिळुन चोरीला गेलेले दिसले. या प्रकरणी शुभम मिसाळ यांनी गुरुवारी (दि.९ जानेवारी) दुपारी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन पोलिसांनी २ अज्ञात चोरट्याविरुध्द बी एन एस २०२३ चे कलम ३०५, ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## गळफास घेवून युवतीची आत्महत्या

नगर - राहत्या घरात दोरीने गळफास घेवून १७ वर्षीय युवतीने आत्महत्या केल्याची घटना सावेडी उपनगरात कॉटेज कॉर्नर जवळील डॉन बॉस्को वसाहतीत गुरुवारी (दि.९ जानेवारी ) दुपारी घडली. दिशा स्वप्नील बागुल (वय १७, रा. डॉन बॉस्को, कॉटेज कॉर्नर, सावेडी) असे मयत युवतीचे नाव आहे.

दिशा बागुल हिने गुरुवारी दुपारी राहत्या घरात गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यावर तिला तिची आई जयश्री बागुल हिने दुपारी ३.५० वाजता उपचारासाठी जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले. तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. ढगे यांनी तिची तपासणी केली असता ती उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. तशी माहिती त्यांनी रूग्णालयात ड्यूटीवर असलेले तोफखाना पोलिस ठाण्यातील पोलिस अंमलदारांना दिली. त्यांनी याबाबत तोफखाना पोलिसांना माहिती दिली. या माहिती वरून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. अधिक तपास महिला पो.हे.कॉ. नेटके या करत आहेत.

## श्रीमती चंद्रभागा गाडेकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील सिव्हिल हडको परिसरातील श्रीमती चंद्रभागा दत्तात्रय गाडेकर (वय ७९) यांचे २ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## श्रीमती विमलबाई दिवाणे यांचे निधन



नगर - येथील श्रीमती विमलबाई जयकुमार दिवाणे (वय ७९, रा.चौपाटी कारंजा) यांचे ९ जानेवारी रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## श्रीमती लिलाबाई तातेड यांचे संथाराव्रतात निर्वाण



नगर - येथील श्रीमती लिलाबाई कांतीलाल तातेड (चांभुर्डीवाला) (वय ७१, रा.वृंदावन कॉलनी, कोठी) यांचे ९ जानेवारी रोजी संथाराव्रतात निर्वाण झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, जाऊबाई, नातवंडे असा परिवार आहे. श्रावणी ज्वेलर्स व बडीसाजन श्री संघाचे संचालक राजेंद्र तातेड यांच्या त्या मातोश्री होत. त्या विजय (मुंबई), दिलीप (नाशिक), किशोर, सुनील यांच्या चुलती होत.

## कुसुम निकम यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - राहाता येथील साईनाथ कॉलनी, घोलप मंगल कार्यालय येथील रहिवासी कुसुम दत्तात्रय निकम (वय ९२) यांचे १० जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर राहाता अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. गृहसुरक्षा दलातील मंदार सटाणकर यांच्या त्या आत्या होत.

## अरुण झिरंगे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - गोंधवणीरोड, श्रीरामपूर येथील रहिवासी अरुण विठ्ठल झिरंगे (वय ७५) यांचे १० जानेवारी रोजी अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात भाऊ, एक मुलगा, एक मुलगी, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पतसंस्थेचे व्हा.चेअरमन श्री.चंद्रकांत झिरंगे यांचे थोरले बंधू, आशिष झिरंगे यांचे वडील होत.

## यमुनाबाई पवार यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील यमुनाबाई किसनराव पवार (वय ८९) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, पाच मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

हॉटेल ओम समोसाचे मालक मनोहर पवार यांच्या मातोश्री, रोहित पवार यांच्या आजी होत.

# महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या मैदानाचे १३ जानेवारी रोजी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते होणार भूमिपूजन

नगर - महाराष्ट्र राज्य व पहिल्यांदा जिल्हा कुस्तीगीर संघाच्या वतीने आयोजित महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा वाडिया पार्क येथे २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी रोजी होणार असून आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली नियोजनाची बैठक झाली.

यावेळी पै. अनिल गुंजाळ, जिल्हा क्रीडा अधिकारी आमसिद्ध सोनलकर, क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, काका शेळके, युवराज करंजुले, अभिजीत खोसे, सुरेश बनसोडे, संभाजी पवार, दिलीप पवार, वैभव ढाकणे, संतोष ढाकणे, मळू गाडळकर, अतुल कावळे, मोहन गुंजाळ, निलेश हिंगे, दादा पांडुळे, सचिन जगताप, भरत पवार, सागर गुंजाळ, चेतन शेलार, संजय शेळके, सोनू घेबुड, मंगेश खताळ आदी उपस्थित होते

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, वाडिया पार्क मैदानामध्ये पहिल्यांदाच ६७ वी राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी स्पर्धा होणार आहे. १३ जानेवारी रोजी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते मैदानाच्या कामाचे भूमिपूजन सकाळी १० वाजता होणार आहे. तसेच कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटनाचे निमंत्रण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन देण्यात आले आहे. देश व राज्यभरातून कुस्ती पाहण्यासाठी कुस्तीप्रेमी येणार आहे. सुमारे ५० हजार जणांची बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे. या ठिकाणी लाल मातीचे व मॅटचे असे दोन मैदान तयार केले जाणार आहे. देशात महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा नावलौकिक होईल अशी तयारी केली जात आहे, अहिल्यानगर जिल्हा हा कुस्तीपटूंचा म्हणून ओळखला जात आहे. नवीन कुस्तीगीर निर्माण करण्यासाठी त्यांना चांगल्या दर्जाच्या सुविधा व मार्गदर्शन देण्यासाठी वाडिया पार्क मैदानामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जेचे मैदान निर्माण होणार आहे. महिलाही आता क्रीडा क्षेत्रामध्ये नावलौकिक मिळवत असून श्रीगोंदा तालुक्यातील भाग्यश्री फंड या कन्येने नॅशनल कुस्ती स्पर्धेमध्ये बाजी मारली असून आपल्या जिल्ह्याला नावलौकिक मिळवून दिला आहे असे ते म्हणाले.

### आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली नियोजनाची बैठक



वाडिया पार्क येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य व जिल्हा कुस्तीगीर संघाच्या वतीने आयोजित महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या नियोजन बैठकीत बोलताना आ. संग्राम जगताप. (छाया - लहू दळवी)

# लाडकी बहिण योजनेसाठी पोस्ट पेमेंट बँक खाते उघडण्यास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### तब्बल १ लाख २९ हजार ४४४ नवीन खाती

नगर - राज्य शासनाच्या लाडकी बहिण योजना अंतर्गत महिलांसाठी पोस्ट पेमेंट बँकेत खाते उघडण्याच्या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. अहमदनगर विभागातील पोस्ट पेमेंट बँक शाखांद्वारे सहा महिन्यांत तब्बल १ लाख २९ हजार ४४४ महिलांनी नवीन खाती उघडली आहेत. यामुळे महिलांना बँकिंग सुविधांसोबतच विविध शासकीय योजनांचा लाभ घेणे सुलभ झाले आहे.

पोस्ट पेमेंट बँकेत खाते उघडण्यासाठी महिलांना फक्त आधारकार्ड आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचे शुल्क न आकारता खाते उघडण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागांमध्ये महिलांनी या सुविधेचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला आहे.

गत सहा महिन्यांत पोस्ट खात्यांद्वारे ९० कोटी रुपयांपेक्षा जास्त आर्थिक व्यवहार झाले आहेत. यामुळे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळाली असून, बँकिंग क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढत आहे.

लाडकी बहिणी योजना सुरू झाल्यापासून पोस्ट कार्यालयांनी महिलांना उत्तम सेवा देण्यावर भर दिला आहे. खातेदार महिलांसाठी वेगवेगळ्या सवलती आणि सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पोस्ट पेमेंट बँक महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे अहमदनगर विभागाचे वरिष्ठ अधीक्षक बी. नंदा यांनी सांगितले.

## पोस्ट बँकेत खाते काढणे आता झाले अधिक सुलभ

नगर - भारतीय डाक विभागाने ग्राहकांसाठी पोस्ट ऑफिस सेव्हिंग्स बँक (पीओएसबी) डिजिटल स्वरूपात आणण्यासाठी पेपरलेस ई-केवायसी आणि आधार बायोमेट्रिक प्रमाणीकरण सुरू केले आहे. यामुळे खाते उघडणे तसेच सुरक्षित आणि जलद व्यवहार करणे अधिक सोयीचे झाले आहे.

ग्राहक आता आधार बायोमेट्रिक प्रमाणीकरणाचा वापर करून खाते उघडू शकतात. खाते क्रमांक आणि बोटांचे ठसे वापरून ५ हजार रुपयांपर्यंत रक्कम काढणे तसेच खाते व्यवस्थापन करता येईल. यामुळे ग्राहकांची सही जुळण्याच्या अडचणी दूर होतील आणि व्यवहार अधिक सुरक्षित होतील.

डिजिटल पद्धतीमुळे लाडकी बहीण योजना, लेक लाडकी योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, मातृत्व योजना यांसारख्या थेट लाभ हस्तांतरणासाठी (डीबीटी) खात्याचा सहज उपयोग होणार आहे. याशिवाय, ग्राहक इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेच्या खात्याला (पीओएसए) लिंक करून घरबसल्या पैसे जमा, काढणे, तसेच खाते तपशील मिळवणे आदी सेवांचा लाभ ग्राहकांना घेता येणार आहे. ग्राहकांनी अधिक माहितीसाठी जवळच्या पोस्ट कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन अहमदनगर पोस्ट विभागाचे वरिष्ठ अधीक्षक बी. नंदा यांनी केले आहे.

# ६ वर्षापूर्वी पळवून नेलेली अल्पवयीन मुलगी सापडली चाकणला

नगर - नगर जिल्ह्यातील कसारा दुमाला (ता. संगमनेर) येथून ६ वर्षापूर्वी पळवून नेलेल्या अल्पवयीन मुलीला शोधण्यात पोलिस अधीक्षक कार्यालयातील अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षातील पथकाला अखेर यश आले असून अपहृत मुलगी व तिला पळवून नेणाऱ्या आरोपीला चाकण (जि.पुणे) येथे पकडण्यात आले आहे. यातील आरोपी अतुल कैलास जाधव (रा. सहारा सिटी, म्हाळुंगे, ता. चाकण) यास पुढील कार्यवाही साठी संगमनेर शहर पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले आहे.

कसारा दुमाला येथील अल्पवयीन मुलीला अज्ञात आरोपीने दि.१९ जुलै २०१९ रोजी फुस लावुन पळवुन नेले होते. सदर बाबत संगमनेर शहर पोलिस ठाण्यात भा.दं.वि.कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्ह्याचा तपास न लागल्याने तो भा.दं.वि. कलम ३७० हे वाढीव कलम लावून तपासकामी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष यांचेकडे वर्ग करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक बाळासाहेब शिंदे हे करीत होते.

### आरोपीला ठोकल्या बेड्या, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाची कामगिरी



कसारा दुमाला (ता. संगमनेर) येथून ६ वर्षापूर्वी पळवून नेलेल्या अल्पवयीन मुलीला व आरोपीला शोधून चाकण येथून ताब्यात घेतल्या नंतर त्यांच्या समवेत अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षातील पथक.

गुन्ह्याचा तपास करताना पो.नि. राजेंद्र इंगळे व शाखेचे अधिकारी,अंमलदार यांनी वेगवेगळ्या मार्गाने व गुप्त बातमीदारामार्फत माहिती काढुन शोध घेतला असता अशी माहिती मिळाली की, सदर गुन्ह्यातील अपहरीत मुलगी हिला यातील आरोपी अतुल कैलास जाधव हा चाकण येथे घेवून राहत आहे. अशी माहिती मिळाल्याने पो.नि. राजेंद्र इंगळे, उपनिरीक्षक बाळासाहेब शिंदे यांनी पोलिस पथकासह चाकण येथे जावून स्थानिक पोलीसांच्या मदतीने आरोपीचा व अपहरीत मुलीचा शोध घेतला असता अपहरीत मुलगी व आरोपी अतुल जाधव हे मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेत पुढील तपासकामी संगमनेर शहर पोलीस स्टेशनला हजर करण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक प्रशांत खैरे, पोलीस उपअधिक्षक गणेश उगले यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र इंगळे, उपनिरीक्षक बाळासाहेब शिंदे, पो.हे.कॉ. समीर सय्यद, महिला पो.हे.कॉ. अनिता पवार, महिला पो.कॉ. छाया रांधवन, चालक पो.कॉ. गोरे यांच्या पथकाने केली आहे.

# जिल्हा सहकारी बँकेची भरती प्रक्रिया पारदर्शकपणे होणार; स्वयंघोषित एजंटापासून सावध रहा : आमदार शिवाजी कर्डिले



नगर - जिल्हा सहकारी बँकेची भरती प्रक्रिया परीक्षेच्या रूपाने आजपासून पुणे या ठिकाणी सुरू झाली आहे. भरती प्रक्रिया पारदर्शकपणे व्हावी यासाठीच पुण्यासारख्या ठिकाणी ऑनलाइन सिस्टीमने ही प्रक्रिया पूर्ण होणार असून स्वयंघोषित एजंट पासून परीक्षार्थी व त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनी सावध राहावे, असे आवाहन बँकेचे अध्यक्ष आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी केले आहे.

जिल्हा बँकेसाठी गुरुवारपासून पुणे येथे भरती प्रक्रिया सुरू झाली असून ७०० जागांसाठी सुमारे २८ हजार अर्ज आलेले आहेत. आपल्या मुलाला अथवा मुलीला जवळच्या नातेवाईकाला या भरतीच्या माध्यमातून नोकरी मिळावी म्हणून गेल्या काही दिवसापासून बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक यांच्याकडे कार्यकर्ते पदाधिकारी मित्र परिवार नातेवाईक यांची मोठी वर्दळ वाढल्याने बँकेच्या पदाधिकाऱ्यांची देखील यामुळे डोकेदुखी वाढली आहे. यासंदर्भात बँकेचे अध्यक्ष आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी ठोस भूमिका घेत भरती प्रक्रिया संदर्भात सविस्तर भूमिकाच बँकेच्या वतीने मांडली असून विधानसभेच्या निवडणुकीमध्ये कार्यकर्ते, हितचिंतक, पदाधिकारीक तरुण वर्ग सर्वांनीच प्रामाणिकपणे मोठे सहकार्य केले आणि म्हणूनच मोठ्या मताधिक्याने माझा विजय झाला त्याबद्दल सर्वांचे आभारी आहेच, परंतु जिल्हा सहकारी बँक आशिया खंडातील सर्वात मोठी बँक असून या बँकेचा पारदर्शक कारभार सुरू आहे त्यामुळे होणारी भरती प्रक्रिया देखील पारदर्शकपणे व्हावी अभ्यासू हुशार गुणवंत विद्यार्थ्यांना या भरती प्रक्रियेच्या माध्यमातून न्याय मिळावा हिच माझी प्रामाणिक इच्छा आहे.

तसेच उमेदवारांना परिक्षा देण्यासाठी पुण्यात जावे लागणार आहे कारण अहिल्यानगर जिल्ह्यात इतक्या उमेदवारांची परिक्षा घेण्याची सर्व तांत्रिक सुविधा उपलब्ध नाही. पाहिजे तेवढी परिक्षा घेण्यासाठी कम्प्युटर उपलब्ध नाहीत. त्यांना इथे परिक्षा घेतल्यास काही अडचणी निर्माण होऊ शकतात; जसे की लाईट, इंटरनेट कनेक्टिव्हीटी इत्यादी सुविधा पुरेश्या प्रमाणात न मिळाल्यास अडचणी झाल्या असत्या असे कंपनीचे म्हणणे होते, त्यात तथ्य आहे. त्यामुळे या सर्व अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने पुण्यात परंतु नगरच्या जवळ परिक्षा घेण्याचे नियोजन कंपनीमार्फत केले गेले आहे. पुण्यासारख्या ठिकाणी संबंधित कंपनीच्या माध्यमातून ही भरती प्रक्रिया होणार आहे. ९, १०, ११, १२, १३ व १९ जानेवारीपर्यंत ही परिक्षा पार पाडणार आहे

ही भरती प्रक्रिया पारदर्शकपणे पार व्हावी यासाठी राज्य सरकारने त्यांच्या निकषास पात्र सर्व नियम अटी पुर्ण करणाऱ्या सहा कंपन्यांचा पॅनल तयार करून बँकेस कळविला त्यानुसार बँकेने रितसर शासनाचे मार्गदर्शक सूचनानुसार कोटेशन मागवून त्यातील एका कंपनीला या भरती प्रक्रियेचे कामकाज देण्यात आले. नगर येथे भरती प्रक्रिया पूर्ण करायची म्हटले असते तर शनिवार-रविवार दोनच दिवस शाळांना सुट्टी असतात अशावेळी भरती प्रक्रिया करावी लागली असती त्यामुळे ही भरती प्रक्रिया पुढील अनेक दिवस सुरू राहिली असती. ज्या शिक्षण संस्था उपलब्ध आहेत त्यातील बऱ्याचशा शिक्षण संस्था बँकेच्या संचालक मंडळाशी सलग्न आहेत. त्यामुळे पुन्हा त्या ठिकाणी त्या शिक्षण संस्थेत भरती प्रक्रिया झाली असती तर गैरसमज वाढले असते.

तसेच भरती प्रक्रियेच्या ठिकाणी लाईट जनरेटर सुरक्षा सर्व व्यवस्था वेळेत उपलब्ध असणे देखील महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये बैठकीसह सर्व व्यवस्था त्या ठिकाणी संबंधित कंपनीने केलेली आहे. हुशार अभ्यासू गुणवंत विद्यार्थ्यांना निश्चितपणे या भरती प्रक्रियेमध्ये यश मिळेल असा विश्वास व्यक्त करत बँक भरती प्रक्रियेच्या नावाखाली काही स्वयंघोषित एजंट देखील तयार होतील. ठराविक भाव फुटला असे कर्डिले यांनी सांगून त्यांनी पुढे सांगितले की, परीक्षार्थी विद्यार्थी अथवा त्यांच्या नातेवाईकांशी जवळीक साधून त्यांची फसवणूक करू शकतात अशा स्वयंघोषित एजंटांपासून परीक्षार्थी विद्यार्थी व त्यांच्या नातेवाईकांनी सावध राहावे.

भरती प्रक्रियेमध्ये कुठल्या प्रकारची वशीलेबाजी होणार नसुन आर्थिक देवाण-घेवाण कोणाशी करू नये असे आवाहन देखील आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी यानिमित्ताने केले आहे. त्यांनी शासनाकडे याबाबत मागणी करताना जिल्हा बँकेच्या भरती प्रक्रियेतून बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळ यांना भरती प्रक्रियेपासून चार हात बाजूला ठेवावे. विनाकारण संचालक मंडळाला कुठल्याच प्रकारचा मनस्ताप नको अशा स्वरूपाची देखील मागणी बँक संचालक मंडळाच्यावतीने सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांना पुणे येथे झालेल्या बैठकीच्या वेळी केलेली आहे. बँकेचा कारभार पारदर्शकपणे सुरू आहे, बँकेची भरती प्रक्रिया देखील पारदर्शकपणे व्हावी हा एकमेव प्रामाणिकपणे बँकेचा या मागचा हेतू आहे.

मुलाखतीचे पाच गुण देण्यासाठी मुलाखत समिती असणार आहे त्यामध्ये संचालकांचा समावेश देखील नाही. सदर समितीमध्ये सहकार खाते, एम्प्लॉयमेंट, समाज कल्याण, महिला व बालकल्याण, आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्प इत्यादि विभागाचे अधिकारी तसेच बँकेचे चेअरमन व मुख्य कार्यकारी अधिकारी हे असणार आहेत व ते गुणदान करणार आहे. त्याचप्रमाणे पाच गुण हे उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रते नुसारचे गुण कशाप्रकारे मिळणार आहे हे देखील जाहिरीतीत स्पष्टपणे नमूद केलेले आहे. सदर समितीमध्ये चेअरमन म्हणून माझा देखील समावेश नको अशी प्रामाणिक भावना आम्ही सहकार मंत्र्यांकडे व्यक्त केली असल्याचे देखील आमदार कर्डिले यांनी यानिमित्ताने सांगितले.

# गृहिणी

## आरोग्य

### उच्च रक्तदाब असलेल्यांसाठी

उच्च रक्तदाब (उच्च बीपी) ही एक सामान्य समस्या आहे जी जगभरातील लाखो लोकांना प्रभावित करते. अति मिठाच्या सेवनाने रक्तदाब वाढतो तसेच यामध्ये डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेणे सोडणे धोकादायक ठरू शकते.

## पाककला

### केळ्याची केरोळी

**साहित्य :** पिकलेली राजेळी केळी, साखर, ओले खोबरे, वेलदोडे, खसखस, बेदाणे, काजू, तूप.

**कृती :** राजेळी केळी सोलून, चांगली वाफवून घ्यावीत. नंतर गरम असतानाच पुरण वाटावयाच्या यंत्राने ती वाटून घ्यावीत. केळ्याचा एक वाटी गोळा घेतल्यास एक वाटी खोवलेले खोबरे व पाऊण वाटी साखर घ्यावी. नंतर साखर व खोबरे चांगले शिजवून घ्यावे. त्यात खसखस भाजून कुटून घालावी. बेदाणे, काजूचे तुकडे व वेलदोड्यांची पूड घालावी व सारण तयार करावे. केळ्याच्या गोळ्यांची मोदकासारखी पातळ पापडी करून, त्यात वरील सारण भरून, पापडी बंद करावी व तुपावर तांबूस भाजावी.

## वास्तू

### बँक

✻ प्रवेशद्वार उत्तर सर्वोत्तम अन्यथा पूर्व किंवा ईशान्य चांगले.

✻ पूर्वोत्तर भाग मोकळा असावा. ग्राहकांसाठी आसन व्यवस्था येथे चांगली असते. पूर्व ते उत्तर भागात ग्राहक सेवा काऊंटर असावे.

✻ उत्तर दिशेत कॅश जमा अथवा देण्याचा काऊंटर असावा.

## सल्ला

साबुदाण्याचे पीठ करावयाचे असल्यास त्याला प्रथम थोडे पाणी लावावे (साधारणपणे एक वाटी साबुदाण्याला पाव वाटी पाणी घ्यावे) व नंतर साबूदाणा भाजून दळावा, म्हणजे पीठ बारीक व मऊसर होईल.

## सौंदर्य

डोळे मोठे असतील तर आय-लायनर अगदी बारीक रेषेत लावावे.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. ११ जानेवारी २०२५

**शनिप्रदोष, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष शुक्लपक्ष, रोहिणी १२।२९, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ३८ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : व्यापारात कार्यक्षेत्राचा विकास, व्यापारिक बाधा येऊ शकतात.

**वृषभ** : यात्रा घडू शकते. अडकलेला पैसा मिळाल्याने आनंद वाटेल. कौटुंबिक चिंता दूर होईल. कर्मक्षेत्रात धावपळ होईल.

**मिथुन** : संपत्ती संबंधी सौद्यात लाभ होण्याची शक्यता.

**कर्क** : व्यावसायिक स्थिति चांगली राहील. परंतु खूप प्रयत्न करावा लागेल.

**सिंह** : अत्यधिक प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील. नवे काम, विचार, योजना लांबणीवर ठेवा.

**कन्या** : आर्थिक विवादातून नुकसान संभव. कामात मित्रांचा सहयोग मिळेल. आर्थिक लाभ मिळू शकेल.

**तूळ** : कर्जा पासून मुक्ति मिळेल. व्यापारिक लाभ होईल.

**वृश्चिक** : समाजात व परिवारात आदर मिळेल. सामाजिक मान-सन्मान वाढेल.

**धनु** : प्रगतिवर्धक बातम्या मिळतील. मुलांची उन्नति प्रसन्नता देईल. आधी केलेल्या कामाचे फळ मिळेल.

**मकर** : बिघडलेले संबंध सुधारतील. महत्वपूर्ण कार्यांवर व्यय होईल.

**कुंभ** : मित्रांच्या सहाय्याने अनुकूलता वाढेल एवं दिवस उत्तम जाईल.

**मीन** : लाभ प्राप्तिचा योग. व्यापारातील आर्थिक त्रासाला संयमाने सोडवण्याचा प्रयत्न करा. निवेश प्रत्याशित.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

## अपयशातील यश

ज्योतिषाने शरदरावांना सांगितले की 'तुम्हाला नेहमी यश मिळेल' पण मला तर प्रत्येक गोष्टीत हमखास अपयश मिळत आहे. शरदरावांनी आपली व्यथा सांगितली

बरोबर म्हणजे अपयश मिळण्यामध्येच तुम्हाला सध्या यश मिळत आहे. फलज्योतिषी मिष्किलपणे हसत म्हणाला.


# जागतिक आश्चर्ये

## हर्स्ट टॉवर मॅनहटन

हर्स्ट टॉवर ४६ मजली इमारत आहे. तीचा रंग पूर्णत: हिरवा आहे. या टॉवरचे डिझाईनच असे आहे की या टॉवरच्या उभारणीसाठी इतर बिल्डींगच्या मानाने २०% स्टील कमी लागले आहे.

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०९० सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) अंथरण्याचे एक जाड वस्त्र ३) मोठेपणा; महती; महिमा; थोरवी ६) लोणी ७) अंदाज; अनुमान; तर्क ९) भीम, दुर्योधनाचे शस्त्र १०) एक स्थितिस्थापक पदार्थ तर्क १४) मूळ मुद्दलाच्या व्याजासह झालेली दुप्पट रक्कम १७) लाट; हुक्की; तरंग १८) गायीचे मादी वासरू २०) चैतन्य; शुद्धी; अंत:करण २१) एक पक्षी; कावळा ; वायस २२) घाई; धांदल; गडबड २३) बीज; बियाणे

**उभे शब्द :-** १) बाहेर जाणारे; निर्यात होणारे २) मनसब धारण करणारा ३) कामना; इच्छा; आकांक्षा ४) कर; हस्त ५) खिडक्या वगैरेंना लावण्यात येणारी काच ८) मित्र; दोस्त; सखा ११) एक प्रकारची दारू १२) एक प्रकारचे वहाण १३) एक प्रकारचे तलम सुती कापड १५) जेथे वस्तू विकत मिळतात ते ठिकाण; शॉप १६) पदार्थाचा उडालेला तुकडा १९) उतरण; ढाळ; कडपा; टेकडी २०) वाटा; हिस्सा शॉप

**शब्दगंध क्र. ७०८९ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. ११७१ चे उत्तर**



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : अॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** महत्त्व कळले तरच त्याचे मोल आणि वापर कळतो मग ती...व्यक्ती असो की वस्तु शब्द असो की पाणी

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## चलनी नाणी केव्हापासून व्यवहारात आली?

चलनी नाणी व नोटा यांच्यामुळे आज व्यवहार खूपच सुलभ झाला आहे. आपण कुठेही बाहेर पडताना खिशात पैसे ठेवतो. हे पैसे देऊन आपल्याला हव्या त्या गोष्टी आपण विकत घेतो. पूर्वीच्या काळी जेव्हा चलन अस्तित्वात नव्हते, तेव्हा गरजेच्या वस्तूंची देवाणघेवाण होत असे. म्हणजे समुद्रकाठी राहणारे लोक आपल्याकडचे मीठ समुद्रापासून दूर राहणाऱ्या लोकांना द्यायचे आणि त्यांच्याकडून कापूस घ्यायचे किंवा लोकर नि कातडी देऊन तंबाखू नि काचेचे मणी घ्यायचे. असा देवाणघेवाणीचा व्यवहार पूर्वी चालत असे. यामुळे हा व्यवहार करणाऱ्या बाजारपेठा निर्माण झाल्या. मात्र या व्यवहारात खूप अडचणी होत्या. गाड्या भरभरून माल इकडून तिकडे हलवावा लागायचा.

या अडचणी दूर करण्याच्या प्रयत्नात प्रथम सोने-चांदीच्या चिपांमार्फत व्यवहार सुरू झाला. भारतात रामायण-महाभारत कालाच्या आधीपासून सुवर्णमुद्रा किंवा मोहरा अस्तित्वात होत्या. पाश्चात्त्य देशांत लिडियामध्ये इ. स. पू. ७०० मध्ये प्रथम सोने-चांदी यांच्या मिश्रणाच्या मुद्रा सापडतात. पुढे लिडियातून या मुद्रा ग्रीसमध्ये व तिथून रोमन साम्राज्यातही लोकप्रिय झाल्या. प्रत्येक राजा आपापल्या नवनव्या मुद्रा पाडत असे. यावर बहुधा राजाचा चेहरा किंवा स्तुतीपर मजकूर याला राजाचा 'शिक्का' म्हणायचे. उत्तर हिंदुस्थानांत आजही नाण्याला 'सिक्का' असे. असेच म्हणतात.


भारतात पूर्वीच्या काळापासून हुंडीची पद्धत होती, तर चीनमध्ये इ. सनच्या दुसऱ्या शतकापासून नोटा असल्याचा पुरावा मिळतो. स्वीडनमध्ये आधुनिक काळातल्या नोटा सर्वप्रथम व्यवहारात आल्या त्या सतराव्या शतकात. आता चेक, ड्राफ्ट अशा व्यवहारपद्धती अस्तित्वात आल्या आहेत. यामुळे हुंडीच्या पद्धतीला पुन्हा महत्त्व प्राप्त झाले आहे. म्हणजे व्यवहाराची दुनियादेखील गोलच आहे.

## प्रज्ञाचक्षू

एका गावात एक अंधळा राहात असे. तो कोणत्याही प्राण्याला हात लावून त्याची जात ओळखण्यात फार प्रसिद्ध होता. एकदा एका माणसाने एक लांडग्याचे पिलू त्याच्याकडे परीक्षेसाठी आणले. अंधळ्याने त्याला जवळ घेऊन अंग चाचपून पाहिले, पण त्याची परीक्षा त्याला झाली नाही. मग तो थट्टेने त्या लांडग्याच्या पोराला म्हणाला, 'अरे, तू कुत्र्याचं पिलू आहेस की लांडग्याचं हे मी खात्रीपूर्वक सांगू शकलो नाही, तरी तुला मेंढराच्या कळपात सोडण्याचा सल्ला मी कधीही देणार नाही !'

तात्पर्य : गाढवाचे पोर गोजिरवाणे दिसले तरी त्याचा गाढवपणा कधीही लपत नाही.

# रहमते दर्शन (भाग - १)



थोड़ी देर में मुझे महाराज जी ने बुलवा भेजा। मैं महाराज जी की कोठी में पहली मंज़िल पर पहुँचा। वहाँ बहुत से लोग बैठे थे। मैं भी वहाँ जा कर बैठ गया। ऊपर पहुँचा तो महाराज जी ने इशारे से मुझे अपने पास बुलाया। मैं हैरान था कि मुझे महाराज जी जानते भी नहीं हैं, फिर भी बुला रहे हैं। मैं यथावत खड़ा रहा। इशारा पाकर एक सरदार जी महाराज जी की ओर बढ़े कि शायद उन्हें ही महाराज जी बुला रहे हैं, परन्तु महाराज जी ने फिर मेरी ओर इशारा किया। मैं समझ गया कि महाराज जी मुझे ही बला रहे हैं। मैं आगे बढ़ा और महाराज जी को दंडवत प्रणाम किया। महाराज जी ने स्वयं मुझे खड़ा किया और बोले. तू आ गया। मैंने कहा, हाँ महाराज जी, मैं आ गया। महाराज जी ने कहा, 'लो प्रसाद ले लो। महाराज जी और मैं एक-दूसरे में इतना खो गये कि महाराज जी एक के बाद दूसरा प्रशाद का पैकेट मुझे देते रहे। बीच में किसी सेवादार ने आकर रोक दिया कि महाराज जी क्या सारा कुछ इसी को दे दोगे? अगली बार फरवरी के जन्मोत्सव पर मुझे नामदान भी मिल गया और उस दिन मुझे बहुत अच्छा अनुभव हुआ।

### मौत के पंजे से छुड़ाना

एक बार हमारे घर में सत्संग का प्रोग्राम था। मुझे महाराज जी ने दर्शन दिये और बोले, सत्संग मैं स्वयं करूँगा। मैं सत्संग के कायदे कानून से नावाकिफ था। मैंने अपने लड़के को प्रसाद और गंगा जल सत्संग के वास्ते लाने के लिये भेजा। परन्तु एक सत्संगी महिला से यह सुन कर कि गुरु तो इन सब चीजों से ऊपर होता है, मुझे अपनी गलती का अहसास हुआ और मैं तुरन्त लड़के को मना करने के लिए बस में बैठकर गाँव में जाने लगा। जब बस जमुना के पुराने पुल से गुजर रही थी तो मुझे संत कृपालसिंह जी जमुना के जल पर खड़े हुए दिखाई दिये। मैंने गंगा जल के लिए लड़के को मना तो कर दिया, परन्तु गुरु ने मेरे अन्दर छुपी हुई गंगा मैया की श्रद्धा को यूँ पूरा किया।

एक दिन मैं सो रहा था तो अचानक एक सफेद वस्त्रधारी लड़की ने मुझे जगा दिया। मैं उठा तो लड़की नदारद थी। मैं उठ बैठा और भजन पर बैठ गया। भजन में बैठकर मुझे एक अन्य दृश्य दिखाई दिया। मेरे कमरे में गंगा जी प्रकट हुई और तीनों महापुरुष भी गंगा जी पर प्रकट हो गये। फिर हुज़ूर बाबा सावनसिंह जी और परम संत कृपालसिंह जी महाराज ने मुझे संत दर्शनसिंह जी की ओर इशारा करते हुए कहा, ये तुम्हारे गुरु हैं। फिर महाराज सावनसिंह जी ने संत कृपालसिंह जी को मेरा ऑपरेशन करने का आदेश दिया। संत कृपालसिंह जी ने मेरा ऑपरेशन करना शुरू कर दिया। मेरी छाती को

चीर कर उन्होंने मेरे हृदय में से कोई चीज निकाली। मैं देख रहा था। उस पर ॐ लिखा था। महाराज जी ने उसे हाथ में ले कर गंगा जल में धोया और फिर से उसे यथास्थान पर रख दिया। इस प्रकार महाराज जी ने मेरा अन्तःकरण शुद्ध करने का यह निराला तरीका चुना। था, एक बार मुझे मकान ख़रीदना था। पैसा पास में नहीं था। मैं हमेशा चिंता में रहता था कि मकान कैसे खरीदूँ? मकान भी देख रखा था। परन्तु हैसियत नहीं थी मकान खरीदने की। एक दिन मैं नहा रहा तो महाराज दर्शनसिंह जी प्रकट हुए और बोले, 'जो मकान तुम लेना चाहते

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

जो भी चित्र स्थूल या मन में देख रहे हैं, आप को उस जैसा बनने की प्रेरणा मिलेगी। स्थूल आंखो या मन की आंखो से जिस भी चित्र को देखते हैं, हमारा मन उन से वह व्यक्ति या वस्तु ब्रह्मांड में चाहे कहीं भी हो और उस इष्ट, व्यक्ति जुड़ जाता है व वस्तु की एनेर्जी हमारे मन में आने लगती है। किसी भी मनुष्य से जब हम २० सेकेंड से ज्यादा देर आई कान्टैक्ट करते हैं तो उसकी एनेर्जी से हम प्रभावित होने लगते हैं या वह हमारे से प्रभावित होने लगता है और ये यादें बहुत लम्बे समय तक हमारे दिमाग में बनीं

रहती हैं। जब हम पलक झपके बिना कोई बुक पढ़ते है, किसी व्यक्ति, वस्तु व भगवान को देखते हैं तो हमारी एकाग्रता बढ जाती है और वह हमें लम्बे समय तक याद रहती हैं। खाना बनाते, खाते पीते, बातचीत करते, प्रवचन या लेक्चर सुनते समय आंखो के झपकने पर नियन्त्रण रखें तो वह चीजे लम्बे समय तक याद रहेगी। जब हम आंखो के झपकने पर नियन्त्रण लम्बे समय तक रख पाते हैं तो हमारे दिमाग की शक्ति बढ़ जाती है जिस से तीसरा नेत्र खुल जाता है। जिस से मन में गहरे तल पर पड़ी हुई चीजें हम पढ़ सकते हैं। जितनी ज्यादा आंखे झपकते हैं उतना दिमाग कमजोर होता है और यादाश्त कम होती जाएगी। आंखें सर्वाधिक संवेदनशील केन्द्र हैं।

### दिमाग की शक्ती

किसी व्यक्ति में गजब का आकर्षण देखा गया है। यह आकर्षण उनकी आंखों के कारण ही होता है। आंखो की इसी चमत्कारी शक्ति के दम पर अकेला व्यक्ति हजारों-लाखों की भीड़ को प्रभावित ही नहीं अपनी मर्जी के मुताबिक चला भी सकता है। आंखो के द्वारा दूसरों के मन की बातें जान सकते हैं। आप भी आंखों में जादूई चमक पैदा कर सकते हैं। ज्यादा से ज्यादा पानी पीएं, दिन में कई बार आंखों पर ठंडे पानी के छींटे मारें । शुद्ध और प्राकृतिक आहार-विहार करें। बाजारू खाने से यथा संभव बचें। आंखों का काम करते समय बीच-बीच में कुछ समय के लिये आंखें बंद करके खोई हुई ऊर्जा को फिर से प्राप्त करें। इस समय इष्ट के दिव्य रूप को मन में देखा करें। प्रतिदिन रात्रि के प्रथम और अंतिम पहर में २५ से ३० मिनिट तक परमात्मा शिव के बिन्दु पर ध्यान केंद्रित करें। स्मृति और इन्द्रियां नाक, मुंह और कान

अपनी स्मृति को शक्तिशाली बनानें और गहरे तल पर पड़े ज्ञान के खजाने को प्राप्त करने के लिये हमें नाक-कान आदि शक्तियों से भी लाभ लेना चाहिए।

हम नाक से सूंघते हैं। जिनकी अच्छी खुशबू होती है, वह चीजे हमें लुभाती हैं, वह सदा याद रहती हैं। ऐसे ही जो सूचना याद रखना चाहते है, जो दिव्य बल प्राप्त करना चाहते है, उन में खुशबू भर दो वह चित्र जिन में खुशबू है सच में आप को ऐसा अहसास करायेंगे और हमें याद रहेंगे। जिन चीजो को याद नहीं रखना चाहते है उन में बुदबु भर दो। वह चीजे दिमाग में आते ही हम उन से दूर हो जाएंगे।

जो चीजे स्वादिष्ट होती हैं, उन्हें हम खाना पसंद करते हैं। जो याद रखना चाहते हैं उन्हें किसी भोजन का रूप दे सकते हैं। आप की मन पसंद डिश क्या है। आप को हलवा पसंद है। जो याद रखना चाहते हैं, जो सिद्धि आप चाहते हैं, उसे हलवा समझो। जैसे ही हलवा याद आएगा, सारी चीजे याद आयेंगी जो आवाज सुरीली होती है वह हमें याद रहती हैं हम गुनगुनाते हैं। जो आवाजे सुरीली नहीं, उन्हें हम नहीं सुनते। जो याद रखना चाहते हैं उसे किसी गीत के साथ जोड़ दें। जैसे ही गीत बजेगा या आप सोचेंगें वह सब चीजे याद आयेंगी। एक गीत है - हमें तुम से प्यार कितना । जो ज्ञान याद रखना है उसे कहें हमें तुम से प्यार कितना । जो दिव्य बल, दिव्य शक्ति चाहते हैं, उसे गुनगुनाए हमें तुम से प्यार कितना ।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

तेथील डॉक्टरांचा व आपला परिचय असणे महत्त्वाचे असते. कारण प्रसूती होताना गर्भवतीला मानसिक आधाराची गरज असते. जर डॉक्टरांशी परिचय नसेल, तर प्रसूतीसाठी नाव नोंदणी करताना परिचय करून घ्यावा.

आजच्या काळात प्रसूती गर्भवती स्त्रीच्या माहेरीच व्हायला पाहिजे अशी आग्रही भूमिका असू नये. जर तिचे माहेर खेडेगावात असेल आणि सासर शहराच्या ठिकाणी असेल तर प्रसूती होताना बाळ किंवा बाळंतिणीच्या जीवाला समजा धोका निर्माण झाला, तर शहराच्या ठिकाणी मोठ्या हॉस्पिटलमध्ये सर्व सुविधा उपलब्ध असतात; म्हणून माहेर जर खेड्यामध्ये असेल, तर गर्भवती स्त्रीच्या आईला काही दिवसांसाठी सासरी बोलावून प्रसूती। करून घ्यावी.

प्रसूतीनंतर बाळाची व आईची तब्येत चांगली असेल तर माहेरी जाण्यास हरकत नाही. जर माहेर शहरात असेल व प्रसूतीसाठी तिकडे जायचे असेल, तर माहेरी गेल्यानंतर प्रथमतः जिथे प्रसूती करायची त्या डॉक्टरांना भेटून आपली फाईल, कागदपत्रे, सोनोग्राफीचे रिपोर्टस, रक्त, लघवी तपासणीचे रिपोर्टस दाखवून घ्यावेत. अचानक प्रसूतीच्या वेळेस जाणे धोक्याचे होऊ शकते. प्रसूतीच्या वेळेला गर्भवतीच्या आईने व पतीने जवळ असणे फार महत्त्वाचे असते, कारण पती व आईकडून तिला मानसिक आधार मिळतो.

### नवव्या महिन्यात घ्यावयाची काळजी

४) पाश्चात्य देशांमध्ये प्रसूतीसमयी पतीलाही बोलावून घेतात; त्यामुळे मनोबल वाढते.

५) प्रसूतीला जाण्याआधी आपली व बाळाची अशा दोन बॅगा भरून ठेवाव्या. आपल्या बॅगेत पॅडस्, टॉवेल, ब्रश, पेस्ट, साबण, मॉइश्चराईजर क्रीम, पावडर, कंगवा, टिकल्यांचे पाकीट त्याचबरोबर २ निकर, परकर, २ फिडींग गाऊनस् ज्यामुळे बाळाला स्तनपान करण्यास सोपे जाईल अशा वस्तू ठेवाव्या. बाळाच्या बॅगेत वाटी, चमचा, अंगातील झबली, दुपटी, लंगोट, टोपी हे कपडे घ्यावेत. थंडीचे दिवस असतील, तर बाळ व आईसाठी स्वेटर घ्यावे. शक्यतो जुन्या सुती, स्वच्छ धुतलेल्या दोन साड्या असाव्यात, म्हणजे ऐनवेळी बाळ व बाळंतीणीला कपडे कमी पडल्यास त्या वापरता येतात. बाळाचे कपडे शक्यतो कॉटनचे व आधी धुतलेले असावे. बाळाच्या दुपट्यांना टिपा मारून घ्याव्यात, म्हणजे त्याचे धागे बाळाच्या अंगामध्ये गुंतून इजा होणार नाही.

६) प्रसूतिगृह घराच्या जवळ असावे तसेच तेथील डॉक्टर; त्यांच्याकडे येणारे व्हिजीटींग डॉक्टर, भूल तज्ञ यांची नीट चौकशी करून घ्यावी. प्रसूतिगृहात नाव नोंदणी झाल्यावर जिथे प्रसूती होणार आहे. ती डिलिव्हरी रूम पहावी म्हणजे तेथील वातावरण माहितीचे, ओळखीचे झाल्यामुळे ऐनवेळी गर्भवतीला भीती वाटणार नाही. प्रसूती होताना सिझेरीयनची वेळ येऊ शकते; म्हणून शस्त्रक्रिया कक्ष बघून घ्यावे. म्हणजे एकदम प्रसूतीच्या वेळेस तिथे गेल्यानंतर तिथे भीती वाटणार नाही. अचानक जर आपण या वातावरणात गेलो, तर घाबरल्यामुळे मनावर त्याचा ताण येऊन रक्तदाब वाढू शकतो.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# संस्कृतीची रुजवण करणारे शिक्षकच परिवर्तन घडवू शकतात

**अभय भंडारी यांचे प्रतिपादन; संपदा विद्या प्रतिष्ठान, ज्ञानसंपदा स्कूल आयोजित ज्ञानसंपदा व्याख्यानमाला दुसरे पुष्प**

नगर – आपण जे पेरतो तेच उगवते, स्वार्थ पेरला तर स्वार्थ उगवतो. लहानपणी मन अतिशय संवेदनशील असतं अशावेळी जे संस्कार पेराल तर तेच उगवतात. सुसंस्कारित आई–वडील घडवणे ही शिक्षकांची जबाबदारी आहे. भावी पिढीला आपण घडवतो आहोत याची जाणीव ठेवून कार्य करायला हवे कारण परिवर्तन फक्त शिक्षकच घडवू शकतो, असे प्रतिपादन व्याख्याते अभय भंडारी यांनी केले.

संपदा विद्या प्रतिष्ठान संचलित ज्ञानसंपदा स्कूल तर्फे आयोजित ज्ञानसंपदा व्याख्यानमालेत अभय भंडारी यांनी 'भारतीय सांस्कृतिक मूल्ये व शिक्षण' या विषयावर दुसरे पुष्प गुंफले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बजाज, स्कूल कमिटीचे चेअरमन कारभारी भिंगारे, श्रीहरी टिपुगडे, अविनाश बोपर्डीकर आदि उपस्थित होते व्याख्यानमालेचे चौदावे वर्ष आहे.

श्री. भंडारी पुढे म्हणाले, भारताने कधीही कोणाला द्वेष करायला शिकवले नाही. जगातल्या कुठल्याही संस्कृतीशी, भाषेशी भारताचे वैर नव्हते. तक्षशिला, नालंदा विद्यापीठात अनेक परकीय भाषा शिकवल्या जात होत्या याचे पुरावे मिळतात. त्या त्या भाषेमध्ये चिंतन संस्कृती निर्माण करणे हे स्वाभाविक आहे हे भारतीयांनी स्वीकारलं होतं. ही सहनशीलता भारतीयांमध्ये दिसते म्हणूनच भारतामध्ये लोकशाही रुजली व विकसित झाली.

प्रत्येक राज्यातील भाषा वेगळी, आहार वेगळे, विहार वेगळे, पोषाख वेगळे, वातावरण वेगळे, लोक परंपरा वेगळी, संस्कृतिक धारणा वेगळ्या एवढे वैविध्य असलेला देश लोकशाहीने एकत्र बांधता येऊ शकतो यावर चांगल्या चांगल्या बुद्धिमान लोकांचा विश्वास नव्हता ही विविधतेमधील एकता स्वीकारणं हे आमचं जेनेटिक लक्षण आहे ते आम्हाला संस्कृतीने दिले आहे.

ही सांस्कृतिक मुल्ये आम्ही जेव्हा लहानपणापासून मुलांमध्ये रुजवू तेव्हा त्याचे परिणाम निश्चितच चांगले असतील. कारण आजवर ज्या ज्या विद्वानांनी भारतीय संस्कृतीचा निरपेक्षपणे अभ्यास केला त्यांनी मुक्तकंठाने गौरवच केला आहे. मात्र हा गौरव कधीही आम्हाला शिकवला गेला नाही. मेकॉलेला भारतीयांना गुलामीचे शिक्षण देण्यासाठी भारतीय संस्कृती बद्दलची आस्था मुळातून संपवणे गरजेचे होते म्हणून त्या प्रकारची शिक्षण व्यवस्था निर्माण केली गेली. दुर्दैव आमचं की तीच शिक्षण पद्धती स्वातंत्र्यानंतर जशीच्या तशी आजपर्यंत आम्ही वापरत आहोत.




संपदा विद्या प्रतिष्ठान संचलित ज्ञानसंपदा स्कूल तर्फे आयोजित ज्ञानसंपदा व्याख्यानमालेत ज्येष्ठ व्याख्याते अभय भंडारी यांनी 'भारतीय सांस्कृतिक मूल्ये व शिक्षण' या विषयावर दुसरे पुष्प गुंफले. (छाया – उदय जोशी)

भारतीय सांस्कृतिक मूल्य विवेकानंदांनी जगाला सांगितली आणि ती जगाने मान्य केली. वनस्पतींमध्ये संवेदना असतात हे संशोधन करणाऱ्या जगदीशचंद्र बोस यांनी या संशोधनाची प्रेरणा मला भारतीय संस्कृतीतून मिळाली कारण भारतीय संस्कृती चराचरामध्ये देवत्व पाहण्याची शिकवण बालपणापासूनच आपल्याला देते. स्वामी विवेकानंदांनी देह ठेवण्यापूर्वी तरुणांना संदेश दिला भारतमातेला पुढील पन्नास वर्ष तुम्ही ईश्वर मानलं तर बाराशे वर्षाचा गुलामगिरीचा कलंक तूम्ही पूसू शकाल व पारतंत्र्याचा बेड्या तोडू शकाल. जोपर्यंत तुम्ही राजकीय स्वातंत्र्य मिळवणार नाही तोपर्यंत धर्माच्या नावाखाली ज्या मोक्षाची कल्पना तुम्ही मांडता त्या मोक्षाची दृष्टीभेट होण्याची यत्किंचीतही शक्यता नाही असे ते म्हणाले.

उपाध्यक्ष मिलिंद गंधे, मानद सचिव अरुण कुलकर्णी, विश्वस्त विनोद बजाज, विचार भारतीचे रवींद्र मुळे, अरविंद पारगावकर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, डॉ. प्रकाश कांकरिया व सुधा कांकरिया आदी उपस्थित होता.

सौ. मुक्ता दिवेकर यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन कैलास जाधव यांनी केले, परिचय सौ. प्रीती कुलकर्णी यांनी करुन दिला तर आभार श्रीमती शिल्पा कुलकर्णी यांनी मानले.

प्रारंभी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक मूल्य या विषयावरील नाट्य वाचन सादर केले यावर्षीचे बेस्ट आउटगोइंग स्टुडन्ट पुरस्कार (विभागून) सहारा शेख व निशीतकुमार भोज यांना तर बेस्ट स्पोर्ट्समन पुरस्कार राजनंदिनी काळे यांना प्रदान करण्यात आले.



**शिवसेना ठाकरे गटातील ओमकार शेळके यांचा भारतीय जनता पार्टीत प्रवेश**

शिवसेना ठाकरे गटातील विद्यार्थी संघटक ओंमकार शेळके यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी त्यांचे स्वागत शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी केले. यावेळी सचिन पारखी, बाबा सानप, मयूर बोचूघोळ, आकाश सोनवणे, ओंकार लेंडकर, केलास गर्जे, सुमित इपलपेली, रुद्रेश अंबाडे, शिव पंडित, पवन भागवत, अमोल निस्ताने, विश्वजित माने, रोहन शेवाळे, हर्ष गायकवाड, किशोर काळे आदि.

# योग विद्या धामतर्फे १५ जानेवारीपासून 'प्राणायाम व आसन वर्गा'चे आयोजन

नगर – आपल्या फुफुसाची क्षमता व आपली प्रतिकार शक्ती वाढवून विविध विषाणूपासून होणा–या आजारापासून दूर राहण्यासाठी सोपी योगासने व प्राणायामचे वर्ग योग विद्या धाम १५ जानेवारीपासून सुरु करत असल्याची माहिती योग विद्या धाम चे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी दिली.

कचझत नावाचा नवीन विषाणू सध्या आला आहे. या विषाणूमुळे श्वसनाचे त्रास होतात. अशा परिस्थितीत फुफसाची व शरीराची प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी योगासने आणि प्राणायामाचा अभ्यास फार उपयुक्त आहे.

अशी सोपी आसने व प्राणायाम शिकवणारे वर्ग १५ जानेवारीपासून ऑफलाईन योग भवन, सावेडी येथे व १० जानेवारी पासून ऑनलाईन वर्ग सुरू होत आहेत. या वर्गांचा लाभ घ्यावा असे आवाहन योग विद्या धाम चे वर्ग संचालक अनिरुध्द भागवत यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी फोन नंबर ०२४१ – २४२१२५५ व मोबा. ९४२३१ ६२४३८ वर संपर्क साधावा.

# सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थी परिषदेची स्थापना

नगर – तारकपूर येथील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थी परिषद जाहीर झाली आहे. यात एकूण ४४ विद्यार्थ्यांना विविध जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. यातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण निर्माण होण्याबरोबरच संघ भावना तयार होते. यावर्षी हेड बॉय म्हणून शौनक कुलकर्णी तर हेड गर्ल म्हणून सान्वी जोतवानी यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांचा पदग्रहण कार्यक्रम उत्साहात पार पडल्याची माहिती माहिती प्राचार्या गीता तांबे यांनी दिली.



तारकपूर येथील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थी परिषदेची स्थापना करण्यात येऊन ४४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

**शौनक कुलकर्णी हेड बॉय तर सान्वी जोतवानी हेड गर्ल**

विद्यार्थी परिषद पुढीलप्रमाणे– असिस्टंट हेड बॉय–उत्कर्ष भोर, असिस्टंट हेड गर्ल– दृष्टी ललवानी, लिओ कॅप्टन–जुई कुलकर्णी, लिओ व्हा. कॅप्टन– श्लोक इल्लाराम, लिब्रा कॅप्टन– श्रीनाथ म्हस्के, लिब्रा व्हाईस कॅप्टन– अपूर्वा नांदूरकर, पाईसिस कॅप्टन– वेदिका निर्मळ, पाई व्हाईस कॅप्टन– अमोघ पळस्कर, सॅगिटेरियस कॅप्टन– इशान अलचेट्टी, सॅगिटेरियस व्हाईस कॅप्टन– ख्याती करोसिया, स्पोर्टस कॅप्टन बॉय– श्रेयस वन्नम, स्पोर्टस कॅप्टन गर्ल– अनन्या विद्ये, आर्टस् सेक्रेटरी बॉय– दिवेश महाजन, आर्टस् सेक्रेटरी गर्ल– आर्या गायकवाड, सायन्स सेक्रेटरी बॉय– पार्थ पुप्पाल, सायन्स सेक्रेटरी गर्ल– गौरी गिरी, क्लिनलीनेस कॅप्टन बॉय– शौर्य ढोकळे, क्लिनलीनेस कॅप्टन गर्ल– आर्या हारदे, आयसीटी कॅप्टन बॉय– ओंकार दौंड व ऋषीकेश गायकवाड, आयसीटी कॅप्टन गर्ल– दिव्या व्यवहारे, लायब्ररी इन्चार्ज बॉय– अर्णव निर्मळ, लायब्ररी इन्चार्ज गर्ल– आत्मजा वैद्य, इंग्लिश स्पिकींग– अवधूत व्यापारी, मेहरीन खान, उदय देवडे, रिषिता ढवळे, वृषदा भावसार, पूर्वा पवार, शगुन हर्दवाणी, कृष्णा खराडे, सायन्स लॅब असिस्टंट– इशिता लोंढे,स्वरा येवलेकर, अथर्व बोरले, व्हालेंटर– उदय लोंढे, तन्मय देशमुख, सान्वी मदने, गायत्री साबळे, म्युझिक कोऑर्डिनेटर– रूद्र पवार, सई पाथरकर, अथर्व गिरी, रोशन रामनानी.

नवनिर्वाचित विद्यार्थी परिषद पदाधिकाऱ्यांचे संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना नेतृत्वाचे गुण संपादन करण्यास प्रोत्साहन दिले त्याचप्रमाणे शाळेच्या विद्यार्थ्यांसमोर एक आगळी वेगळी प्रतिमा निर्माण करा आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, खजिनदार दामोदर माखीजा, विश्वस्त राजकुमार गुरुनानी, महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, हरेश मध्यान, प्राचार्य गीता तांबे, उपप्राचार्य कांचन पापडेजा, मुख्याध्यापिका गोदावरी किर्तानी, शिक्षकांनी अभिनंदन केले. पदग्रहण सोहळ्याचे सूत्रसंचालन शिरीन शेख यांनी केले.

# 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमातंर्गत ग्रंथ प्रदर्शन व लेखक वाचक संवाद कार्यक्रम

नगर – ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन मुंबई श्रध्दा सार्वजनिक वाचनालय पिंपळगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाच्या अंतर्गत ग्रंथ प्रदर्शन व लेखक वाचक संवाद या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परीषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शैजूळ मॅडम ह्या होत्या.

राज्य शासनाच्या आदेशानुसार राज्यभरात विद्यापीठ आणि महाविद्यालयस्तरावर तसेच सार्वजनिक ग्रंथालय मार्फेत १ ते १५ जानेवारी या कालावधीमध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम दरवर्षी शासनाच्या आदेशानूसार राबवला जाणार असल्याबाबतचे संस्थेचे सचिव वसंत कर्डिले यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे लेखक गिताराम नरवडे (होरपळ कांदबरीकार ग्रामिण लेखक कवी) या प्रसंगी बोलताना रानामधली करडई ज्वारी एकबुटी एकशेलाटी अन. सदोदित चालत राहत्यात या दोघीच्या तरकटी अशा सुंदर वाणीतुन त्यांनी आपल्या कविता सादर केल्या. तसेच श्रध्दा सार्वजनिक वाचनालयामुळे या छोटेखानी पिंपळगाव वाघा येथे वाचन संस्कृती वाढवण्याचा चाललेला हा प्रयत्न खरोखर वाखण्याजोगा आहे. काळाच्या ओघात आणि मोबाईलच्या जमाण्यात ही वाचन संस्कृती मोलाची आहे.वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत भेट देऊन शालेय विद्यार्थी सी संवाद साधुन वाचनालयासाठी शूभेच्छा दिल्या.



ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन मुंबई श्रध्दा सार्वजनिक वाचनालय पिंपळगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाच्या अंतर्गत ग्रंथ प्रदर्शन व लेखक वाचक संवाद या कार्यक्रमामध्ये मुख्याध्यापिका श्रीमती शैजूळ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.

तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती शैजुळ मॅडम यांनीही त्यांच्या लेखन प्रवासात अडचणी त्यावर केलेली मात इतरांकडुन वाचनातुन मिळालेली प्रेरणा त्यांनी आपल्या भाषनातून विद्यार्थीसमोर मनोगत व्यक्त केले. तसेच सर्व शालीय विद्यार्थीनी वाचनालयाचे वाचक सभासद होण्याचे आवाहनही केले. गिताराम नरवडे यांच्या सारखे लेखक कवी व्याख्याते निर्माण होणे उपेक्षित आहेत. आणि ते घडतील असा विश्वास त्यांनी दिला.

या कार्यक्रमासाठी वाचनालयाच्या ग्रंथपाल श्रीमती यमुना कांडेकर यांनी बोलताना सांगितले की वाचन संकल्प महाराष्ट्राचा याउपक्रमामध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थीना प्रोत्साहन पर वाचनालयाच्या वतीने प्रमाणपत्र व विशेष बक्षिस वितरण २६ जानेवारी रोजी करण्यात येईल

तसेच वाचनालयाचे वाचक सभासद किसनराव चौरे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी कुमार लोणारे उद्योजक, प्रविण ठाणगे सर तसेच ग्रंथालय कर्मचारी गणेश वाबळे शालेय विद्यार्थीसह आदि उपस्थित होते.

# सब–ज्युनिअर राज्य ज्यूदो स्पर्धेत नगरच्या सिद्धी दातरंगेला ब्राँझ मेडल

नगर – नुकत्याच शिव छत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे या ठिकाणी ५१ व्या सब–ज्युनिअर राज्य ज्यूदो स्पर्धेमध्ये सिद्धी दातरंगे हिने –५२ किलो वजनी गटात अहिल्यानगर जिल्ह्या कडून नेतृत्व केले. त्यात तिने ब्राँझ मेडल पटकावले. गुरुजनांच्या आशीर्वाद व आई–वडिलां ची खंबीर साथ तिला हा खेळ खेळण्यासाठी आहे.

सिद्धीचे वडील अशोक दातरंगे हे एक समाजसेवक असून ते मनसे वाहतूक सेना शहर जिल्हाध्यक्ष आहे. सिद्धीच्या घराला पहिल्यापासून खेळाचा वारसा चालत आलेला आहे. सिद्धी दातरंगे ही भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल मध्ये इयत्ता सातवी मध्ये शिकत असून ती यंग मेन्स जुडो क्लब सिद्धी बागची खेळाडू आहे.



५१ व्या सब–ज्युनिअर राज्य ज्युदो स्पर्धेत सिद्धी दातरंगे हिने ब्राँझ मेडल मिळविले. याप्रसंगी प्रा. संजय धोपावकर, पीएसआय पै. गणेश लांडगे, पै. शुभम दातरंगे आदी.

तिला राष्ट्रीय किर्तीचे मार्गदर्शक प्रा. संजय धोपावकर, आंतरराष्ट्रीय खेळाडू आदित्य धोपावकर, शालेय खेळ शिक्षक कैलास करपे, सुनील गायकवाड सर, तसेच पीएसआय पै.गणेश लांडगे, विनीत बुरला, फायाज सय्यद, सोनाली साबळे, पै.शुभम दातरंगे, वस्ताद जयंत (लहानु) शिंदे, पै.गोरख खंडागळे, अथर्व नरसाळे, पियुष शिंगारे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.


या यशाबद्दल तिचे पर्जन्येश्वर मित्र मंडळ, श्री एकदंत मित्र मंडळ; दातरंगे मळा मंडळाच्या वतीने तिचे कौतुक व सत्कार करण्यात आले.

५१ व्या सब–ज्युनिअर राज्य ज्यूदो स्पर्धेत सिद्धी दातरंगे हिने ब्राँझ मेडल मिळविले. याप्रसंगी राष्ट्रीय किर्तीचे मार्गदर्शक प्रा. संजय धोपावकर, पीएसआय पै.गणेश लांडगे, पै.शुभम दातरंगे आदी उपस्थित होते.

**चौण्डेश्वरी शाकंभरी नवरात्र व पौष पौर्णिमा महोत्सवानिमित्त**

# भिंगार शहरामध्ये चंडी यज्ञ व पालखी मिरवणुकीचे आयोजन

नगर – भिंगार येथील देवांग कोष्टी समाजाच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाच्या वर्षीही श्री चौण्डेश्वरी माता शाकंभरी नवरात्र व पौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. ७ जानेवारीला विधिवत घटस्थापना करण्यात आल्याचे अध्यक्ष शिवम भंडारी यांनी सांगितले.



याबरोबरच १२ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता चंडी यज्ञ होईल. १३ जानेवारीला पहाटे ५ ते ७ चौण्डेश्वरी मातेचा अभिषेक व महापूजा, दुपारी ४ वाजता पालखी मिरवणूक, सायं. ६ वाजता विद्यार्थी गुणगौरव कन्यारत्न व समाजभूषण पुरस्कार वितरण, तसेच सायंकाळी ७ वाजता महाआरती होईल. कार्यक्रमांना समाजबांधवांनी उपस्थित रहावे, असे आवाहन देवांग कोष्टी समाज भिंगार अध्यक्ष शिवम भंडारी यांनी केले आहे.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सचिव अनिल सोळसे, संदीप टेके, किशोर उपरे, प्रवीण खरपे, बाळकृष्ण कुमठेकर, पवन बोंदर्ड, राहुल लिपरे आदी प्रयत्नशील आहेत.

# वाचाल तर वाचाल; आजच्या घडीला वाचन महत्त्वाचे

**सुजाता पुरी यांचे प्रतिपादन; अहमदनगर महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत ' विद्यार्थी व लेखक, साहित्यिक यांच्यामध्ये वाचन संवाद'**

नगर – आजची तरुणाई दिशाहिन झाली आहे, त्यांना योग्य मार्गावर आणण्यासाठी विविध ग्रंथांचे वाचन करणे आवश्यक आहे. ग्रंथ वाचनामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजास उपयुक्त असे समाजभान निर्माण होईल. ते विवेकी विचार करण्यास परावृत्त होतील. त्यांचा आयक्यू वाढण्यापेक्षा ईक्यू वाढवणे आवश्यक आहे. तुम्ही वाचन संकल्प करा, मनन करण्यास शिका याच बरोबर कवी, कादंबरीकार आणि कथाकार व्हा त्यांनी कविता व लेख यामधील भेद करतांना म्हणाल्या की 'कविता' एक मोठा एकदम येणारा पाऊस आहे. 'लेख' म्हणजे रिमझिम पाऊस. तुमची लेखनी जेवढी सुदृढ होईल तेवढा तुमचा हजरजबाबी वाढेल, सभाधिटपणा वाढेल, म्हणून आजच्या घडीला वाचन महत्त्वाचे. आज गरज आहे ती मुलींना कराटे व मुलांना पराटे शिकण्याची. वाचन संस्कृतित जात, धर्म आणि भाषा या प्रकारची बंधने नसतात.भुक लागेल त्याला स्वयंपाक करता यायला पाहिजे, समतावादी तत्व वडगाव गुप्ता जि.प.शाळेच्या शिक्षिका सुजाता पुरी मांडले.



अहमदनगर महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत ग्रंथालय, विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना, करिअर कट्टा, मराठी विभाग, हिंदी विभाग आणि इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'विद्यार्थी व लेखक साहित्यिक यांच्यामध्ये वाचन संवाद' कार्यक्रमाप्रसंगी वडगाव गुप्ता जि .प शाळेच्या शिक्षिका सुजाता पुरी यांचा प्राचार्य डॉ.आर.जे.बार्नबस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अहमदनगर महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत ग्रंथालय, विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना, करिअर कट्टा, मराठी विभाग, हिंदी विभाग आणि इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'विद्यार्थी व लेखक साहित्यिक यांच्यामध्ये वाचन संवाद' कार्यक्रमाप्रसंगी सुजाता पुरी बोलत होत्या.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य नोएल पारगे म्हणाले की, वाचन संस्कृतीचा विकास व्हावा, तरुणांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा, समाजप्रबोधन करणे, तरुण पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करणे हे उद्देश डोळ्यासमोर ठेवून वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयीन तरुणांनी सतत वाचन व चिंतन केले पाहिजे, जेणे करून भविष्यामध्ये देशात अनेक नवनवीन उद्योजक, संशोधक, उत्कृष्ट शिक्षक, समाज उपयुक्त नागरिक निर्माण होतील.

यावेळी उपप्राचार्य प्रा.दिलीपकुमार भालसिंग, विनाअनुदान विभाग प्रमुख प्रा.डॉ .सय्यद रज्ज़ाक, उपप्राचार्य प्रो प्रीतमकुमार बेदरकर, कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. संतोष कांबळे, प्रा.डॉ.पोपट शिनारे राष्ट्रीय सेवा योजना विभाग समन्वयक, प्रा. डॉ. माधव जाधव राष्ट्रीय छात्र सेना समन्वयक उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्ताविक प्रा. डॉ. अशोक घोरपडे यांनी केले. प्रमुख पाहुण्याच्या परिचय डॉ. प्रशांत फुगनगर यांनी केला. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे रजिस्ट्रार पिटर चक्रनारायण यांचे सहकार्य लाभले. कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी उपस्थित होते. सुत्रसंचालन प्रा. डॉ. प्रकाश सुर्यवंशी यांनी केले.

आभार प्रदर्शन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. भागवत परकाळ यांनी केले.




कोहिनूर मंगल कार्यालयात आयोजित सावित्री ज्योती महोत्सवाचे वीर माता-पत्नींच्या हस्ते उद्घाटन करण्यात येवून त्यांचा सन्मान करण्यात आला.

# सावित्री ज्योती महोत्सवाचे वीर माता-पत्नींच्या हस्ते उद्घाटन

## बचत गटातील महिलांच्या विविध उत्पादनांचे थाटले स्टॉल; वीर माता, वीर पत्नींचा सन्मान

नगर - बचत गटातील महिलांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी, युवकांच्या कला-गुणांना चालना देण्यासाठी व विविध कार्यक्रमासह सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचा समावेश असलेल्या चार दिवसीय सावित्री ज्योती महोत्सवाचे उद्घाटन वीर माता, वीर पत्नींच्या हस्ते करण्यात आले.

सावेडी येथील कोहिनूर मंगल कार्यालयात या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, राज्यातील महिलांच्या विविध उत्पादनांचे विविध स्टॉल थाटण्यात आले आहेत. ९ ते १२ जानेवारी दरम्यान जय युवा अॅकॅडमी, नेहरु युवा केंद्र, जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर महानगरपालिका, रयत प्रतिष्ठान, उडान फाउंडेशन, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा रुग्णालय, शहर बार असोसिएशन, असोसिएशन ऑफ एनजीओ महाराष्ट्र राज्य आदींच्या सहयोगाने हा महोत्सव होत आहे. त्याच्या उद्घाटनाप्रसंगी स्वागताध्यक्ष तथा माजी नगरसेवक किशोर डागवाले, महेंद्र (भैय्या) गंधे, अॅड. वाल्मीक (तात्या) निकाळजे, सिने कलाकर राजेंद्र गटणे, डॉ. दिलीप जोंधळे, सुहासराव सोनवणे, जयश्री शिंदे, दिनेश शिंदे, रजनी ताठे, आरती शिंदे, राजकुमार चिंतामणी, जयेश शिंदे, राजेंद्र उदागे, बाळासाहेब पाटोळे, वीर पत्नी लताताई वारुळे, संयोजक अॅड. महेश शिंदे, अनिल साळवे, आरती शिंदे, प्राचार्य संजय पडोळे, शाहीर कान्हू सुंबे, दिनेश शिंदे, अंबिका भोंदे, रामदास फुले, कांचन लद्दे आदींसह महिला उपस्थित होत्या.

किशोर डागवाले म्हणाले की, महिला या समाजाचा आणि कुटुंबाचा कणा आहेत. कुटुंबाची आर्थिक घडी बसविण्याचे काम त्या करत असतात. महिला बचत गटातील उद्योगधंद्यांना चालना दिल्यास आर्थिक प्रगती साधली जाणार आहे. बचतगट चळवळीतून सामाजिक क्रांती घडणार असल्याचे त्यांनी सांगितले. तर बचतगट चळवळीला नेहमीच सहकार्य राहणार असल्याचे आश्वासन दिले.

अॅड. वाल्मीक निकाळजे म्हणाले की, पिझ्झापेक्षा आपलं पिठलं भाकरी हे जगतिक ब्रँण्ड ठरू शकते. यासाठी महिला बचत गटांनी पुढाकार घ्यावा. सकस व देशी खाद्यांच्या ब्रॅण्डसाठी बचत गट पुढे येत आहे. महिला बचत गटांच्या उद्योग धंद्याना चालना व बाजारपेठ मिळण्यासाठी सावित्री ज्योती महोत्सव एक उत्तम व्यासपीठ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राजेंद्र गटणे यांनी नगरकर नेहमीच काळजात असून, त्यांनी दिलेल्या प्रेमामुळे सिनेक्षेत्रात स्व:ची ओळख निर्माण करता आली. अर्थकारणात महिलांचे मोठे योगदान आहे. जिच्या हातात तिजोरी, ती कुटुंब उध्दारी... असे सांगून महिलांच्या व्यावहारिक ज्ञानाचे त्यांनी कौतुक केले. प्रा. भगवान काटे यांनी इंटरनॅशनल बाजारपेठ लक्षात घेऊन बचत गटांच्या महिलांनी उत्पादने निर्माण करावी. ग्रामीण भागातून मोठे ब्रॅण्ड निर्माण होत असून, महिलांनी एकजुटी पुढे जाण्याचे आवाहन करुन त्यांना बचत गट संदर्भात मार्गदर्शन केले.

प्रास्ताविकात अॅड. महेश शिंदे यांनी दरवर्षी होणारे सावित्री ज्योती महोत्सव बचत गटातील महिलांच्या उद्योग व्यवसायाला चालना देण्याचे काम करत आहे. यावर्षी देखील मोठ्या प्रमाणात लाखोची उलाढाल होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या सोहळ्यात वीर माता, वीर पत्नी व जवानांच्या पत्नींनी झालेल्या दिलेल्या सन्मानाबद्दल आभार मानले. तर सैनिकांची पत्नी व माता असल्याचे अभिमान असून, भावी पिढीत देशभक्ती रुजविण्याचे कार्य सैनिक कुटुंबीय करत आहे. कर्म म्हणून सैनिक देशसेवा करत असल्याचे सांगून, दिल दिया है ...जान भी देंगे, ए वतन तेरे लिए! हे गीत त्यांनी सादर केले.

सूत्रसंचालन अनंत द्रवीड यांनी केले. आभार सुहासराव सोनवणे यांनी मानले.

सावित्री ज्योती महोत्सवात वीर माता, वीर पत्नींचा सन्मान

या सोहळ्यात जिल्ह्यातील वीर माता, वीर पत्नीं तसेच जवानांच्या पत्नींना विशेष आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन करुन त्यांचा सन्मान करण्यात आला.

# निमगाव वाघात १२ जानेवारीला रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

नगर - निमगाव वाघा (ता. नगर) येथे स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती आणि राष्ट्रीय युवा सप्ताह निमित्त जिल्हा क्रीडा कार्यालय, श्री नवनाथ युवा मंडळ व स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने १२ जानेवारी रोजी रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या विशेष घटक युवक कल्याण प्रशिक्षण शिबिर कार्यक्रमातंर्गत हा उपक्रम राबविण्यात येणार असून, सदर शिबिरात पंचक्रोशीतील ग्रामस्थांना सहभागी होण्याचे आवाहन युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डोंगरे व डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी केले आहे.

रक्ताचा तुटवडा भरुन काढण्यासाठी व ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. न्यू अर्पण ब्लड बँकच्या माध्यमातून रक्तदान शिबिर होणार आहे, तर डॉ. भाग्यश्री पवार ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करणार आहेत. युवक-युवतींसह ग्रामस्थांनी सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान करावे व ज्येष्ठ नागरिक व महिलांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेण्याचे नाना डोंगरे यांनी म्हंटले आहे. रक्तदान करणाऱ्यांचा प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देवून सत्कार केला जाणार आहे. रक्तदान व आरोग्य शिबिरासाठी अशोक भालके, भाऊसाहेब डोंगरे, दादा डोंगरे, अनिल डोंगरे, राजू जाधव, बाळासाहेब गायकवाड, अतुल फलके, पिंटू जाधव आदी परिश्रम घेत आहेत.

# संचेती परिवाराचे शिर्डी येथे ११ व १२ जानेवारीला आंतरराष्ट्रीय संमेलन

## विविध कार्यक्रमाचे आयोजन

नाशिक - संचेती परिवाराचे आंतरराष्ट्रीय संमेलन ११ व १२ जानेवारी रोजी शिर्डी येथे साई पालखी निवारा या ठिकाणी होणार आहे. या संमेनलात महाराष्ट्रसह जगभरातून संचेती परिवाराचे सदस्य एकत्र येणार आहे. या संमेलनात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. दोन दिवशीय संमेलनात सर्व संचेती परिवाराच्या सदस्यांनी सामील व्हावे, असे आवाहन आयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

दोन दिवशीय संमेलनात पहिल्या दिवशी उदघाटन सोहळा होणार आहे. यावेळी नवकार मंत्र, गणेश वंदना व त्यानतंर स्वागत गीतांनी या कार्यक्रमाचे सुरुवात होईल. त्यानंतर संमेलनाच्या उद्देशाबाबत स्वागताध्यक्ष अॅड. गौतम संचेती (छत्रपती संभाजीनगर) यांचे भाषण होणार आहे. तर स्वागतपर भाषण माजी राज्यसभेचे खासदार अजय संचेती (नागपूर) यांचे असणार आहे. दुसऱ्या दिवसाच्या दुसऱ्या सत्रात संचेती परिवाराचा इतिहास यावर दिल्लीचे अशोक संचेती हे माहिती देणार आहे. यानंतर संचेती परिवारातील विविध क्षेत्रात विशेष काम करणाऱ्यांचा सत्कार सोहळा होणार आहे. रात्री विचारमंथन व अखंड ज्योतसह भव्य कुल माताजी सच्चीयाय एव बाबा रामदेवजी की भक्ती असा भक्तीसंगीतावर कार्यक्रम होणार आहे. तर दुसऱ्या दिवशी जीवगौरव व त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या संमेलनात सहा वेळा आमदार झालेल्या मलकापूर विधानसभेचे आमदार चैनसुख संचेती यांचा विशेष सत्कार संमेलाध्यक्ष माजी खासदार अजय संचेती यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कांतीलाल संचेती (पुणे), वालचंद संचेती (उद्योजक) पुणे), बेबीलाल संचेती (अध्यक्ष एसएनजेबी, चांदवड), मोहनलाल संचेती (बिल्डर, पुणे), रविंद्रकुमार बन्सीलाल संचेती (वैजापूर), डॉ. पराग कांतीलाल संचेती (पुणे), विनोद संचेती (हैद्राबाद), सरिता संचेती (सरपंच, मोमासर, राजस्थान), जुगराज संचेती (उपसरपंच, मोमासर, राजस्थान), कंचनदेवी संचेती (सरपंच, डावरा, राजस्थान), तुनसुख संचेती (इंदौर, ग्वालियर), प्रविण बुधमलचजी संचेती (नाशिक), अरविंद संचेती (पूर्व अध्यक्ष, जैन विश्व भारती, अहमदाबाद), दिलीपकुमार संचेती (खेतीया) उपस्थित राहणार आहे.

या संमेलनाला सर्व संचेती परिवाराच्या सदस्यांनी उपस्थितीत रहावे असे आवाहन आयोजन समितीचे अध्यक्ष अजय संचेती, स्वागताध्यक्ष अॅड. गौतम संचेती, कार्याध्यक्ष प्रफुल्ल संचेती (नाशिक), अभय संचेती (पुणे), सचिव पूनमचंद संचेती (वडाळीभोई), उपाध्यक्ष महेश संचेती (पुणे), शोभाचंद संचेती (वैजापूर), इंदरचंद संचेती (लोणार), अनिल संचेती (छत्रपती संभाजीनगर), संतोष संचेती (मलकापूर), धनराज संचेती (अहिल्यानगर), सहसचिव संजय एस. संचेती (छत्रपती संभाजीनगर), कोषाध्यक्ष संतोष संचेती (नाशिक), सहकोषाध्यक्ष महावीर संचेती (शिर्डी), रमेशचंद संचेती (वडाळीभोई), जनसंपर्क प्रमुख पियूष संचेती (अहिल्यानगर) योगेश संचेती (नाशिक) यांनी केले आहे.

# तिरूपती बालाजी येथील श्री वारी सेवेतून अविस्मरणीय आनंद मिळतो

## हरी लखारा यांचे प्रतिपादन



नगरमधील तिरुपती बालाजी भक्तांनी श्री वारी सेवा करून ७ दिवस भक्तांच्या सेवेचा आनंद घेतला.

नगर - मानवसेवा हीच ईश्वर सेवा अशी शिकवण साधूसंत देत असतात. प्रत्येक माणसात देवाचा अंश असतो हे मानून त्याची सेवा केली तर भगवंतही प्रसन्न होतो. याच पवित्र भावनेने जगप्रसिद्ध तिरूपती बालाजी देवस्थान येथे श्री वारी सेवा उपक्रम राबविला जातो. यात भाविक स्वेच्छेने सहभागी होऊन बालाजी भक्तांना सेवा देतात. आमच्या ग्रुपने नुकताच श्रीवारी सेवेचा अविस्मरणीय अनुभव घेतला, अशा भावना बालाजी भक्त हरी लखारा यांनी व्यक्त केल्या.

अहिल्यानगरमधील प्रमोद बोडके, अजय अपूर्वा, हरी लखारा, संदीप पाथरकर, दीपक सिकची, अरविंद सोमानी, दीपक लांडे, संतोष वन्नम, बालाजी गौरी, प्रतिक गांधी, गणेश बंग, गिरीष काबरा यांनी श्री वारी सेवेत सहभाग घेतला. या अनुभवाबाबत बोलताना लखारा यांनी सांगितले की, बालाजी भगवान यांच्या कृपेनेच आम्हाला ही संधी मिळाली. बालाजी दर्शनासाठी नेहमीच जातो. पण तिथं प्रत्यक्ष वास्तव्यास राहून सेवा देताना मन प्रफुल्लित झाले. विजय (बडाभाऊ) गांधी यांच्या प्रेरणेतून आम्ही या कार्यात सहभागी झालो. श्री वारी सेवेसाठी बालाजी देवस्थानच्या वेबसाइटवर गांधी यांनीच आमच्या टिमची नोंदणी करून दिली. सेवा देऊ इच्छिणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असते. देशाच्या विविध भागातील भाविकांसह परदेशातील अनिवासी भारतीयही नोंदणी करतात. त्यामुळे नोंदणी केल्यानंतर देवस्थानकडून ठराविक तारीख संबंधित ग्रुपला दिली जाते. आमच्या टीमला नवीन वर्षाच्या प्रारंभीची १ ते ७ जानेवारी या कालावधीत सेवेची संधी मिळाली. नवीन वर्षाची यापेक्षा अधिक चांगली सुरुवात असूच शकत नाही. सात दिवस देवस्थान व्यवस्थापनाने नेमून दिलेल्या ठिकाणी सेवा दिली. भाविकांना चहा, दूध, कॉफी, खिचडी, उपमा वाटप केले. एक दिवस मंदिरात सेवा देण्याचे भाग्य लाभले. दर्शनासाठी आलेल्या भाविकांना शिस्तबद्ध पद्धतीने लाईनीत दर्शनासाठी सोडण्याचे काम केले.

संपूर्ण ७ दिवस मंतरलेले होते. कितीही वेळ सेवा दिली तरी कंटाळा, थकवा जाणवला नाही. ऊलट नवीन ऊर्जाच प्राप्त झाली. भगवंतांच्या दारात आपल्याला सेवेची संधी मिळाली याचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. श्री वारी सेवेसाठी आलेल्यांची निवास व भोजनाची मोफत व्यवस्था तिरूमला तिरूपती देवस्थानतर्फे करण्यात येते. १८ ते ६० वर्षे वयोगटातील हिंदू पुरुष, महिला सेवा देऊ शकतात. सेवेकरी शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या फिट असणे आवश्यक असते. सेवा देताना देवस्थानने निश्चित केलेला पोशाख परिधान करणे आवश्यक असते. जगातील सर्वात श्रीमंत आणि मोठे देवस्थान असले तरी इथे सर्वत्र आदर्शवत व्यवस्थापन पहायला मिळते. श्रद्धेने येणाऱ्या प्रत्येक भाविकाला कुठल्याही प्रकारचा त्रास न होता सुलभ पद्धतीने दर्शनाचा लाभ मिळतो. गर्दी कितीही झाली तरी शिस्त पाळली जाते.

श्री वारी सेवा एक अलौकिक अनुभव देते. आम्ही सर्वजण वर्षभर पुरेल इतकी सकारात्मक ऊर्जा घेऊन गोविंदा, गोविंदा करत माघारी फिरलो. भविष्यातही संधी मिळाली तर श्री वारी सेवा करायला जाणार असा आमचा मानस आहे.

# आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा सफाई कामगारांना पुरवाव्यात

## राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी.पी. वावा यांचे निर्देश



राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी.पी. वावा यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करताना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ.

नगर - सफाई कामगारांचे प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याबरोबरच आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा, सुरक्षा साधने व कामकाजासाठी सयंत्राचा पुरवठा करण्याचे निर्देश राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी.पी. वावा यांनी दिले.

सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अपर पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा सहआयुक्त प्रशांत खांडकेकर यांच्यासह सफाई कामगार संघटनेचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

डॉ. वावा म्हणाले, अहिल्यानगर महापालिका प्रशासनाने केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभ देण्याची कार्यवाही करावी. कार्यरत सफाई कामगारांना आवश्यक आरोग्य विषयक सेवासोबतच आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

सफाई कामगारांच्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करुन द्यावी. सुरक्षिततेच्यादृष्टीने त्यांना विमा संरक्षण देण्याची कार्यवाही करावी. कामगाराची कठीण समस्यांना सामोरे जावे लागणार नाही तसेच आपल्या हक्कापासून सफाई कामगार वंचित राहणार नाही याकडे लक्ष देण्याच्या सूचनाही डॉ. वावा यांनी दिल्या. यावेळी अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात सफाई कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सोयी - सुविधांबाबत माहिती दिली.

# चेक बाउन्सची केस टाळण्यासाठी दाखल केलेला मनाई हुकूमाचा अर्ज न्यायालयाने फेटाळला

नगर - चेक बाउन्सची केस टाळण्यासाठी दाखल केलेला मनाई हुकूमाचा अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे. नगर न्यायालयातील विशेष दिवाणी दावा १२ डिसेंबर २०२३ रोजी झालेल्या तडजोडीप्रमाणे ताहेर सिराजोद्दीन पटेल यांनी फारूक हबीब शेख आणि अल्ताफ ताजोद्दिन इनामदार यांना रक्कम ८० लाख रुपये देण्याचे मान्य केले होते. या रकमेपोटी धनादेश वटला नसताना चेक बाउन्सची केस टाळण्यासाठी पटेल यांनी चेकचा गैरवापर होवू नये, यासाठी दाखल केलेला मनाई हुकूमाचा अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे.

१२ डिसेंबर २०२३ ताहीर पटेल यांनी फारूक हबीब शेख आणि अल्ताफ ताजोद्दिन इनामदार यांना समजूत करारनामा लिहून दिलेला होता. समजूती करारनाम्याप्रमाणे शेख आणि इनामदार यांना प्रतिवादी करिता रक्कम २० लाख मिळाले होते. उर्वरित राहिलेली ६० लाख रक्कम हे ताहीर पटेल यांनी धनादेश प्रत्येकी २० लाखचे न्यायालयात दाखल केलेल्या प्रोसेस प्रमाणे दिली होती. परंतु ताहेर पटेल यांनी शेख आणि इनामदार यांच्यासोबत परत ३ जुलै २०२४ रोजी पुरवणी समजूत करारनामा करून ५ लाख रुपये दिले. उर्वरित राहिलेले ५५ लाख १३ ऑगस्ट पर्यंत देण्याचे मान्य व कबूल केले होते. त्याबाबत धनादेश दिलेले होते. सदरचे धनादेश प्रतिवादी यांनी वटवण्यासाठी टाकला असतो, तो न वाटता परत आला व ठरल्याप्रमाणे रक्कम अदा झाली नव्हती. म्हणून ताहेर सिराजोद्दीन पटेल यांनी सदर चेक न वाटल्यामुळे स्वतः वर चेक बाउन्स व फसवणुक सारखी केस होऊ नये, म्हणून नगर येथील १२ वे सहदिवानी न्यायाधीश यांच्या न्यायालयात विशेष दिवाणी दावा दाखल केला. सदर दाव्यामध्ये वादी म्हणजे ताहेर पटेल यांनी त्यांनी दिलेल्या चेकचा गैरवापर होऊ नये, म्हणून अर्ज दाखल केला होता. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून प्रतिवादी शेख आणि इनामदार यांच्या वकीलांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन निशाणी पाच वर केलेला मनाई हुकूमाचा अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे.

शेख व इनामदार यांच्या वतीने अॅड. हाजी रफिक बेग, अॅड. रियाज बेग व अॅड. अयाज बेग यांनी काम पाहिले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# सय्यद फकीर मोहंमद शाह चिश्ती (रहे.) दर्गाचा संदल उरुस उत्साहात

## पारंपारिक वाद्यांसह शहरातून निघाली शोभायात्रा



लालटाकी येथील हजरत ख्वाजा सय्यद फकीर मोहंमद शाह चिश्ती (रहे.) दर्गाचा संदल-उरुस बज्म ए चिरागे फकीर चिश्ती इंटरनॅशनल (बी.सी.एफ.आय.) संस्थेच्या वतीने शहरातून पारंपारिक वाद्यांसह शोभायात्रा काढण्यात आली.

नगर - लालटाकी येथील हजरत ख्वाजा सय्यद फकीर मोहंमद शाह चिश्ती (रहे.) दर्गाचा संदल-उरुस बज्म ए चिरागे फकीर चिश्ती इंटरनॅशनल (बी.सी.एफ.आय.) संस्थेच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातून पारंपारिक वाद्यांसह शोभायात्रा काढण्यात आली. तर दर्गात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सज्जादा नशीन हजरत सय्यद मोहसीन अली शाह चिश्ती यांच्या मार्गदर्शनाखाली हा धार्मिक सोहळा पार पडला. शहरातून निघालेल्या शोभायात्रेत जिल्ह्यातील व दक्षिण आफ्रिका (कॅपटाऊन) येथून आलेले भाविक सहभागी झाले होते. पारंपारिक वाद्यांवर धार्मिक गीतांचे सादरीकरण, घोड्यांच्या रथात असलेली फुलांची चादर, मिरवणुकीतील विद्युत रोषणाई आकर्षण ठरली. लालटाकी येथून शोभा यात्रेला प्रारंभ झाले. सर्जेपुरा, कापड बाजार, दाळमंडई, झेंडीगेट, पीरशाह खुंट व पुन्हा सर्जेपुरा मार्गे लालटाकी येथे दर्गाच्या ठिकाणी शोभा यात्रेचा समारोप झाला. प्रार्थने नंतर दर्गाला संदल व फुलाची चादर अर्पण करण्यात आली. संदल उरुस निमित्त दर्गास आकर्षक फुलांची व विद्युत रोषणाईची सजावट करण्यात आली आहे.

संदल, उरुस निमित्त दुसऱ्या दिवशी भाविकांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. तर संध्याकाळी झालेल्या मुशायरा कार्यक्रमात श्रोते मंत्रमुग्ध झाले. रात्री दर्गा परिसरात झालेल्या महफिले समा कव्वाली कार्यक्रमाने भाविक भारावले. यावेळी उपस्थित कव्वाल यांनी सुफी गीतांचे बहारदार सादरीकरण केले.

हजरत फकीर मोहंमद शाह सहाब हे मोहंमद पैगंबर साहेबांचे वंशज असून, त्यांचे पुर्वज हजरत सय्यद आमिनुल मदनी हे मदीना शरीफ अरबस्तान येथून भारतात स्थायिक झाले. हजरत फकीर मो.शाह सहाब यांचा जन्म अहमदनगर येथे झाला. त्यांनी पंचवीस वर्ष पीरशहाखुंट येथील मस्जीदमध्ये इमामत केली. झेंडीगेट येथे खानकाह मदरसेची स्थापना करुन, त्यांनी विद्यार्थ्यांना इस्लाम धर्माची शिकवण दिली. त्यांचे गुरु सय्यद हबीबअली शाह चिश्ती निजामी असून, त्यांची दर्गाह नामपल्ली (हैदराबाद) येथे आहे. हजरत फकीर मो.शाह सहाब यांनी सुफी पंथामधील चिश्तीया निजामी या परंपरेची दिक्षा सय्यद हबीबी अली शाह यांच्याकडून घेतली. या परंपरेचा प्रचार व प्रसार देशासह परदेशात केला गेला. ज्या प्रमाणे हजरत साहेबांनी अहमदनगरमध्ये खानकाह ची स्थापना केली, त्याप्रमाणे त्यांचे नातू हजात सय्यद मेहबुब अली शाह चिश्ती निजामी यांनी प्रभावीपणे देश-विदेशात खानकाची स्थापना केली. हे संदल उरुस धार्मिक एकतेचे प्रतिक असून, खानकाहमधून मानवतेचा संदेश देण्यात येतो. या सुफी-संतांच्या विचारांची जगाला गरज असल्याचे खानकाहचे व्यवस्थापन पहाणारे सज्जादा नशिन हजरत सय्यद मोहसीन अलीशाह सहाब यांनी सांगितले. संदल उरुसचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बी.एस.एफ.आय. संस्थेच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता



## चर्चा 'स्मार्ट इन्सुलिन'ची

मधुमेहाबाबत सातत्याने संशोधन होत असते. रक्तातील शर्करेचे ऊर्जेत रूपांतर करण्याचे काम शरीरातील इन्सुलिन करीत असते. याबाबतही एक अनोखे संशोधन झालेले आहे. मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी) या संस्थेच्या वैज्ञानिकांनी मधुमेहावर गुणकारी ठरणारा इन्सुलिनचा नवा प्रकार (स्मार्ट इन्सुलिन) तयार केला आहे.

हे नव्या प्रकारचे इन्सुलिन रक्तात १० तास फिरत राहते व जेव्हा रक्तातील साखर जास्त होईल तेव्हाच क्रियाशील होते त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णाला अचानक काही होण्याची शक्यता खूपच कमी होते. त्यामुळे रुग्णांना वारंवार रक्तातील साखर तपासण्याची गरज भासणार नाही व रोज इन्सुलिनची इंजेक्शन्स घ्यावी लागणार नाहीत, असे एमआयटीच्या संशोधकांनी म्हटले. टाईप १ मधुमेहात स्वादुपिंडातून इन्सुलिनची निर्मिती होत नाही. त्यामुळे चयापचयाची क्रिया बिघडते, याचे कारण म्हणजे स्नायू व मेद ऊती या रक्तातील ग्लुकोज शोषून घेत असतात. इन्सुलिनच्या इंजेक्शनने या रुग्णांना बरे वाटते. रुग्णांनी इन्सुलिन किती घ्यायचे हे रक्तातील साखर किती आहे त्यांनी कर्बोदके किती सेवन केली आहेत, हे पाहून घ्यावे लागते. एमआयटीच्या वैज्ञानिकांनी बनवलेले स्मार्ट इन्सुलिन रक्तात साखरेचे प्रमाण वाढते तेव्हाच क्रियाशील होते. त्यामुळे रुग्णाच्या रक्तातील साखर कमी होण्याने होणारे मृत्यू टळतात. रक्तातील साखर कमी होण्याला हायपोग्लायसिमिया म्हणतात. त्यात रुग्णाचा मृत्यू होऊ शकते. ग्लुकोज नेमके किती आहे ते पाहून प्रतिसाद देणारे हे इन्सुलिन असून, संशोधकांनी इन्सुलिनमध्ये हायड्रोफोबिक रेणूचा समावेश केला. हा रेणू म्हणजे मेद रेणूंची एक साखळी असते. त्यामुळे इन्सुलिन रक्तप्रवाहात फिरत राहते. संशोधकांनी त्यात पीबीए नावाचे रसायनही टाकले ते ग्लुकोजला विरुद्ध बाजूने बांधू शकते. ज्यावेळी ग्लुकोजचे प्रमाण जास्त असते तेव्हा साखर इन्सुलिनला चिकटते व त्यामुळे इन्सुलिन रक्तातील जागा साखर शोषून घेते. इन्सुलिनला ग्लुकोज नियंत्रणात प्रभावी करण्यासाठी चार प्रकारचे रेणू शोधून काढण्यात आले आहेत. त्यात फ्लोरिन व नायट्रोजनच्या अणूंचा समावेश आहे. हे रासायनिक रेणूंचे प्रकार नंतर नेहमीच्या इन्सुलिनबरोबर वापरण्यात आले. त्यात उंदरांमध्ये साखरेच्या प्रमाणाला १० तासांत प्रतिसाद देऊन त्याचे नियंत्रण करण्यात आले. पीबीए फ्लोरिन बरोबर जास्त चांगले काम करतो व ज्या उंदरांना त्या फ्लोरिनयुक्त रेणू असलेले इन्सुलिन दिले त्यांच्यात ग्लुकोजच्या वाढत्या प्रमाणास जलद प्रतिसाद मिळाला. ♦♦♦

## महाविषारी पेपरफिश

जगाच्या विविध भागांमध्ये वेगवेगळे खाद्यपदार्थ आहेत. त्यापैकी एक असा पदार्थ जो विषारी आहेत. जगातील सर्वात विषारी पदार्थ जो फक्त निवडक लोकच शिजवू शकतात आणि तयार करू शकतात. जर ते नीट शिजवून खाल्ले नाही तर काही मिनिटांतच माणसाचा मृत्यू होऊ शकतो. जपानी डिश फुगू हे जगातील सर्वात विषारी अन्न मानले जाते. ही डिश पेपरफिशपासून तयार केली जाते, ज्यामध्ये सायनाइडपेक्षा कितीतरी पट जास्त विष असते. एका पेपरफिशमध्ये इतके विष असते की ते ३० लोकांचा जीव घेऊ शकतात.



कॅनेडियन इन्स्टिट्यूट ऑफ फूड सेफ्टीच्या अहवालानुसार, जपानमधील फुगू हे जगातील सर्वात विषारी अन्न आहे. त्याला जपानी पफरफिश असेही म्हणतात. पफरफिश हा एक अत्यंत विषारी मासा आहे. ज्याच्या आत टेट्रोडोटॉक्सिन आढळते. या माशाच्या अंडाशय, आतडे आणि यकृतामध्ये जास्तीत जास्त टेट्रोडोटॉक्सिन असते. हे एक न्यूरोटॉक्सिन आहे, जे सायनाइडपेक्षा १२०० पट जास्त घातक आहे. हे इतके विषारी आहे की, सुईच्या टोकाच्या आकाराप्रमाणेही एखाद्या व्यक्तीच्या शरीरात पोहोचले तर त्याचा मृत्यू होऊ शकतो. एका फुगू माशामध्ये इतके विष असते की ते ३० लोकांचा जीव घेऊ शकते.



जपानमधील अनेक रेस्टॉरंटस् फुगू डिश देतात आणि ही डिश केवळ खास प्रशिक्षित शेफद्वारे तयार केली जाते. प्रत्येकजण हा जपानी पदार्थ बनवू शकत नाही. ते करण्यासाठी विशेष प्रशिक्षण आणि परवाना आवश्यक आहे. परवाना मिळवण्यासाठी शेफना अनेक वर्षांचे प्रशिक्षण घ्यावे लागते. विशेष म्हणजे फुगू डिश खूप महाग आहे. साधारणपणे त्याची किंमत ३५०० ते २० हजार रुपयांपर्यंत असते. काही प्रीमियम रेस्टॉरंटमध्ये, फुगू डिशची किंमत ३५ हजार रुपये किंवा त्याहून अधिक असू शकते. त्याची किंमत जास्त आहे कारण ती अनुभवी शेफकडून तयार केली जाते आणि अत्यंत काळजीपूर्वक करावी लागते. या किमतीमध्ये साशिमी, सूप आणि ग्रील्ड फुगू सारख्या विविध फुगू पदार्थांचा समावेश आहे. फुगूची चव चांगली आहे, ज्यामुळे लोकांना ते खूप आवडते. ♦♦♦



## सर्वात आव्हानात्मक विमानतळ


जगभरात अनेक अनोखी विमानतळं आहेत. सेंट मार्टिनच्या माहो बीचवर तर अक्षरशः लोकांच्या डोक्याजवळून उडत जाऊन विमाने विमानतळावर उतरतात. काही विमानतळांवर लँडिंग करणे, हे अतिशय जिकिरीचे काम असते. असाच एक विमानतळ हिमालयाच्या कुशीतील भूतान देशात आहे. या विमानतळावर विमान उतरवण्याचे धाडस केवळ निवडक ५० वैमानिकच करू शकतात!

चारही बाजूंनी हिमालयाच्या पर्वतशिखरांच्या कोंदणात असणारं हे विमानतळ जगातील सर्वाधिक आव्हानात्मक विमानतळ मानलं जातं. इथं वैमानिक भूपृष्ठापासून साधारण १८००० फूट इतक्या उंचच उंच पर्वतरांगांतून अंदाज घेत लँड करतात. इथं धावपट्टीवर विमान उतरवणं कोण्या नवख्या व्यक्तीचं कामच नाही. जगभरातून फक्त ५० वैमानिकांनाच हे आव्हानात्मक काम झेपत असून, या सर्व वैमानिकांना यासाठी विशेष प्रशिक्षण देण्यात आलं आहे. लहानातली लहान धावपट्टी अर्थात रनवे आणि किमान रडार मार्गदर्शनाच्या बळावर विमान उतरवण्याचं विशेष प्रशिक्षण या मंडळींना दिलं जातं. सीएनएनशी संवाद साधताना द्रुक एअरचे वैमानिक कॅप्टन चिमी दोर्जी यांनी दिलेल्या माहितीनुसार पारोमधील विमानतळावर विमान उतरवण्यासाठी त्या व्यक्तीला स्थानिक ठिकाणांविषयीची पूर्वकल्पना असणं अपेक्षित असते. सोबतच त्यांना इथं विमान उतरवण्याचं रितसर प्रशिक्षण असणंही गरजेचे असते. भूतानमधील हे विमानतळ समुद्रसपाटीपासून ७३८२ फूट इतक्या उंचीवर असून, या भागात विरळ हवेमुळं विमानांचा वेग आपोआप वाढून त्यामुळं विमान धावपट्टीवर सुरक्षितरीत्या उतरवणं आव्हानात्मक ठरतं. त्यातच भर असते ती म्हणजे येथील बेभरवशाच्या हवामानाची. सहसा पारो विमानतळावर दुपारच्या वेळी विमानं उतरवली जात नाहीत; कारण ठरतं ते म्हणजे इथं वाढणारा वाऱ्याचा वेग. पावसाळी दिवसांमध्ये इथं विमान उतरवणं मोठं आव्हान. इतकंच नव्हे तर रात्री किंबहुना सूर्यप्रकाश कमी झाल्यानंतरही पारो विमानतळावर विमानं उतरवली जात नाहीत. सभोवताली असणाऱ्या उंचच उंच पर्वतरांगांमध्ये विमान कोसळण्याची भीती असल्यामुळं हे सर्व निर्णय घेण्यात आले आहेत.

## प्रयोग सर्वात कमी तापमानाचा

संशोधक मंडळी प्रयोगशाळेत थक्क करणारे प्रयोग करीत असतात. सर्नच्या प्रयोगशाळेतील देवकण शोधणारा महाप्रयोग असो किंवा चीनसारख्या काही देशांमध्ये प्रति सूर्य निर्माण करण्याचा प्रयोग असो, अशा प्रयोगांनी लोकांना नेहमीच थक्क केले आहे. जगातील सर्वात न्यूनतम तापमानह प्रयोगशाळेतच निर्माण करण्यात आले होते याची तुम्हाला माहिती आहे का? काह वर्षांपूर्वी जगातील सर्वाधिक न्यूनतम तापमान तयार करण्यात इटलीमधील एक प्रयोगशाळेला यश आले होते.

शास्त्रज्ञांच्या मते विश्वा २७३.१५० अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमान असू शकत नाही. य पातळीला ॲब्सोल्युट झीरो अ संबोधले जाते. य पार्श्वभूमीवर इटलीतील क्युओर या प्रयोगशाळेने एक घनमीटर आकाराचे एक तांब्याचे भांडे २७३.१४४ एवढ्या तापमानाला नेण्यात यश मिळवले होते. तत्त्वतः 'ॲब्सोल्युट झीरो'चे तापमान नैसर्गिकपणे आढळणे अपेक्षित नाही. ही एक संकल्पना आहे; परंतु त्याच्या अगदी जवळ जाणारे तापमान तयार करून या प्रयोगशाळेने हा इतिहासच रचला होता. सुमारे ४०० कि.ग्रॅ. वजनाचे हे तांब्याचे भांडे सुमारे १५ दिवस या अतिथंड अवस्थेत होते. या कालावधीत या भांड्याने विश्वातील सगळ्यात थंड वस्तू हा बहुमान मिळवला. क्युओर (क्रायोजेनिक अंडरग्राऊंड ऑब्झर्व्हेटरी फॉर रेअर इव्हेंट्स) ही प्रयोगशाळा इटलीच्या न्यूक्लिअर फिजिक्स इन्स्टिट्यूटच्या ग्रॅन सॅसो नॅशनल लॅबोरेटरीमध्ये कार्यरत आहे. या प्रयोगशाळेत इटलीसह अमेरिका, चीन, स्पेन आणि फ्रान्समधील सुमारे १३० शास्त्रज्ञ कार्यरत आहेत. न्युट्रिनो या सूक्ष्मकणांचा अभ्यास करणे आणि काही दुर्मीळ प्रक्रियांचा शोध घेणे, हे या प्रयोगशाळेचे मुख्य उद्दिष्ट आहे.




## बदकमुखी डायनासोर

कोट्यवधी वर्षांपूर्वी लुप्त झालेल्या डायनासोरच्या विविध प्रजातींचा अद्यापही शोध लागत असतो. आताही मेक्सिकोमध्ये बदकासारखे तोंड असलेल्या डायनासोरचे जीवाश्म सापडले आहे. या डायनासोरच्या नाकाची रचना अनोखी आहे. या डायनासोरला 'कोहुलासौरस लिपानी' असे वैज्ञानिक नाव देण्यात आले आहे.'लिपानी' हे नाव संबंधित जीवाश्म ज्याठिकाणी सापडले त्यावरून तसेच तेथील लिपानी अपाचे या आदिवासी समुदायावरून देण्यात आले आहे.




या डायनासोरच्या जबड्यात दातासारखे काटे होते. ७ कोटी ३० लाख वर्षांपूर्वीची कठीण झाडे खाण्यासाठी त्यांना या काट्यांचा उपयोग होत असावा. सी. लिपानीच्या कवटीचा अंशिक भाग खरे तर १९८० च्या दशकातच पॅरस बेसिनमध्ये संशोधकांना सापडला होता. मात्र, त्यावेळी त्याला एका वेगळ्या कुळाशी संबंधित ठरवण्यात आले होते. आता यावर नवे संशोधन झाले असून, ही एक वेगळी प्रजाती असल्याचे निष्पन्न झाले. या संशोधनाची माहिती 'डायव्हर्सिटी' या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. नॅशनल ऑटोनॉमस युनिव्हर्सिटी ऑफ मेक्सिको येथे ठेवण्यात आलेले हे जीवाश्म त्यासाठी नव्याने अभ्यासण्यात आले. क्लौडिया सेरानो यांच्या नेतृत्वाखाली याबाबतचे संशोधन झाले.

## मरियाना ट्रेंचमधील आवाजाचे गूढ उकलले


जगातील सर्वात खोल ठिकाण म्हणजे प्रशांत महासागरातील मरियाना ट्रेंच नावाची गर्ता. समुद्रतळाशीही डोंगर व दऱ्यांसारखी रचना असते. त्यापैकी सर्वात खोल दरी किंवा गर्ता म्हणजे मरियाना ट्रेंच. या गर्तेमधून अनेक वर्षांपासून घंटानादासारखा एक गूढ आवाज येत होता. आता त्याचे रहस्य उलगडले असून हा आवाज ब्राईडस् व्हेल नावाच्या प्रजातीमधील व्हेल मासे निर्माण करीत असल्याचे आढळून आले आहे.

हा आवाज काहीसा साय-फाय चित्रपटांमध्ये दाखवतात तशा स्टारशिप्स म्हणजेच अंतराळयानांच्या आवाजासारखाही होता. वास्तवात हा आवाज ब्राईडस् व्हेल्सचा असल्याचे निष्पन्न झाले. या व्हेलला बॅलेनोप्टेरा एडेनी असे वैज्ञानिक नाव आहे. मार्को पोलो गेमप्रमाणे हे व्हेल मासे एकमेकांना शोधण्यासाठी असा हाक मारण्याच्या उद्देशाने आवाज काढत असावेत असे संशोधकांना वाटते. २०१४ मध्ये सर्वप्रथम अशा आवाजाचा छडा लावण्यात आला. मरियाना ट्रेंचच्या अकौस्टिक सर्व्हेसाठी पाठवलेल्या अंडरवॉटर ग्लायडर्सनी हा आवाज टिपला होता. जगातील सर्वात खोल गर्ता असलेल्या मरियाना ट्रेंचचा विस्तार जपानच्या दक्षिणेस २४०० किलोमीटरपर्यंत आहे. तिची सर्वाधिक खोली ३५,८७६ फूट म्हणजेच १०,९३५ मीटर इतकी आहे. या गर्तेतून येणारा आवाज दोन प्रकारचा होता. त्यापैकी पहिल्या प्रकारात खोलवरून येणारा कमी स्पष्टतेचा गंभीर आवाज होता. दुसऱ्या प्रकारात धात्वर आघात केल्यावर जसा आवाज येतो किंवा स्टार ट्रेक किंवा स्टार वॉर्ससारख्या चित्रपटांमधील स्पेसशिप म्हणजेच अंतराळयानांचा आवाज जसा दर्शवला जातो, तसा उच्चर वाचा होता. सुरुवातीला या आवाजाने संशोधकांना चकीत केले होते. मात्र २०१६ मध्ये हा आवाज निळा देवमासा किंवा हम्पबॅक व्हेलसारख्या मोठ्या आकाराच्या व्हेल माशांचा असावा असे संशोधकांना वाटले; मात्र हा आवाज त्यांच्या आवाजाशी जुळला नाही. त्याबाबत नवे संशोधन झाल्यावर आवाजाचा नेमका उलगडा झाला. त्याची माहिती फ्रंटियर्स इन मरीन सायन्स नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. या या संशोधनासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्सचाही वापर करण्यात आला. अशा एआय टूल्सनी महासागरांमधील वेगवेगळ्या आवाजांचे दोन लाख तासांचा वेळ घेत वर्गीकरण केले. त्यामधून असे दिसून आले की हा आवाज ब्राईडस् व्हेल माशांचा असू शकतो. ♦♦♦



## अतिप्राचीन वनौषधीला संजीवनी

इस्रायल व वेस्ट बँकमधील ज्युडियन डेझर्ट या वाळवंटातील एका गुहेत सध्या लुप्त झालेल्या वनस्पतीची एक हजार वर्षांपूर्वीची बीजे सापडली होती. आता संशकोधकांनी या बीजांचा वापर करून या लुप्त वनस्पतीला नवसंजीवनी दिली आहे. हजार वर्षांपूर्वीच्या या बीजातून आता एक झाड तयार झाले असून, या औषधी गुणधर्म असलेल्या झाडाचा उल्लेख प्राचीन धर्मग्रंथांमध्येही आहे.



या प्राचीन बीजापासून झाड विकसित करण्यासाठी संशोधकांनी चौदा वर्षे प्रयत्न केले होते. १९८० च्या दशकाच्या अखेरीस या झाडाच्या बिया पुरातत्त्व संशोधकांना ज्युिडयन डेझर्टच्या एका गुहेत सापडल्या होत्या. त्यापासून विकसित केलेले 'शेबा' नावाचे हे झाड आता दहा फूट उंचीचे झाले आहे. याचा अर्थ हे प्राचीन झाड आता पुन्हा अस्तित्वात येऊन त्याची पूर्ण वाढ झाली आहे. संशोधकांना आता या वनस्पतीचे डीएनए, रासायनिक आणि रेडिओकार्बन विश्लेषण करणे शक्य होणार आहे. त्यामधून या झाडाचा मूळ स्रोतही तपासण्यात येईल.

याबाबतच्या संशोधनाची माहिती 'कम्युनिकेशन्स बायोलॉजी' या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. ज्या बियांपासून हे शेबा नावाचे झाड उगवले त्या इसवी सन ९९३ ते १२०२ या काळातील होत्या. दक्षिण लेवंट म्हणजे सध्याच्या इस्रायल, पॅलेस्टाईन आणि जॉर्डनच्या परिसरात एकेकाळी अशी झाडे अस्तित्वात होती व कालांतराने लुप्त झाली. त्यापैकीच एका झाडाच्या बिया या गुहेत सुरक्षित राहिल्या होत्या. ही वनस्पती 'कॉमीफोरा' कुळातील आहे. या कुळातील झाडे ही प्रामुख्याने आफ्रिका, मादागास्कर आणि अरेबियन पेनिन्सुलामध्ये आढळतात. 'शेबा' या झाडाचे मूळ नेमके कुठले आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. ♦♦♦

## उलगडणार चंद्रनिर्मितीचे रहस्य

भारताच्या 'चांद्रयान-१' या मोहिमेवेळीच चंद्रावर पाण्याचे अस्तित्व आहे, हे महत्त्वाचे संशोधन झाले होते. आता 'चांद्रयान-३' मोहिमेने यशस्वी टप्पा गाठला आहे. 'चांद्रयान-३' च्या प्रज्ञान रोव्हरने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरून अत्यंत महत्त्वाचा डेटा पाठवला आहे. यामुळे चंद्राची निर्मिती कशी झाली, या सर्वात मोठा रहस्याचा लवकरच उलगडा होण्यास मदत होणार आहे.

प्रज्ञान रोव्हरने चंद्रावर १६० किलोमीटर व्यासाचा एक नवीन खड्डा शोधला आहे. दक्षिण ध्रुवाजवळील अटकिन बेसिनपासून सुमारे ३५० कि.मी. अंतरावर असलेल्या उंच भागाजवळच हा खड्डा आहे. लँडिंगनंतर चंद्रावर भ्रमण करताना प्रज्ञान रोव्हरने हा खड्डा शोधला होता. प्रज्ञान रोव्हरच्या नेव्हिगेशन आणि हाय रिझोल्युशन कॅमेऱ्यांच्या मदतीने डेटा गोळा केला होता. या डेटाच्या अभ्यातून या विवराची रचना उघड झाली आहे. अहमदाबादच्या भौतिक संशोधन प्रयोगशाळेचे शास्त्रज्ञांनी या डेटाचे विश्लेषण करून नव्या संशोधनबाबतचा अहवाल विज्ञान डायरेक्टच्या नवीन अंकात प्रकाशित केला आहे. चंद्रावरील १६० किलोमीटर व्यासाच्या खड्ड्यासह दक्षिण ध्रुवाजवळील अटकिन बेसिनजवळ १,४०० मीटरचा ढिगारा आढळला आहे. १६० किलोमीटर व्यासाचा हा खड्डा अटकिन बेसिनच्या निर्मितीपूर्वीचा असावा, असा संशोधकांचा दावा आहे. प्रज्ञान रोव्हरने गोळा केलेल्या डेटाच्या मदतीने नवीन स्तरातील धूळ आणि खडकांची संरचना यांच्या मदतीने चंद्राच्या सुरुवातीच्या भूगर्भशास्त्रीय उत्क्रांती समजून घेण्यास मदत होणार आहे. तसेच चंद्राची निर्मिती कशी झाली, याचा उलगडा होण्यास देखील मदत होणार आहे. चंद्र मोहिमेतील हे सर्वात मोठे संशोधन मानले जात आहे.



१४ जुलै २०२३ रोजी भारताचे चांद्रयान-३ चंद्राकडे झेपावले. श्रीहरिकोटामधल्या स्पेस सेंटरमधून २ वाजून ३५ मिनिटांनी चांद्रयान-३ चंद्राकडे झेपावलं. यानंतर २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी चांद्रयान-३ च्या विक्रम लँडरने चंद्रावर सॉफ्ट लँडिंग केले. विक्रम लँडरमधून बाहेर पडलेल्या प्रज्ञान रोव्हरनेचंद्राच्या पृष्ठभागावर फिरत संशोधन केले. चंद्रावरील तापमान, हवामान, चंद्रावर होणारे भूकंप तसेच ऑक्सिजन, आर्यन तसेच इतर खनिजे या संदर्भातील भरपूर डेटा विक्रम लँडर आणि प्रज्ञान रोव्हरने गोळा केला आहे. ♦♦♦



# भारतीय जैन संघटनेच्यावतीने अहिल्यानगर शहरात १६ व १७ जानेवारीला मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीर

**१६ व १७ जानेवारी रोजी तारकपूर रोडवरील आयुष बिल्डिंगमध्ये आयोजन**

नगर - भारतीय जैन संघटना-अहिल्यानगर, श्री चांदमल मुनोत नेवासकर पब्लिक ट्रस्ट व अहिल्यानगर जिल्हा शासकीय रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यामाने स्वर्गीय पद्मश्री डॉ. शरदकुमार दिक्षित (अमेरिका) यांच्या समरणार्थ १६, १७ जानेवारी रोजी २३ वे मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. नगरमधील जिल्हा रुग्णालयात होणाऱ्या या शिबिरात डॉ. राज लाला (अमेरिका) व त्यांचे सहकारी डॉक्टर्स आवश्यक उपचार व सर्जरी करण्यात येणार आहेत. या शिबिरामध्ये मुख्यत्वे करून दुभंगलेले ओंठ, चेहऱ्यावरील विद्रूप वर्ण व डाग, नाक व कान यावरील बाह्यव्यंग, पापण्यातील विकृती अश्या प्रकारच्या सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर असणाऱ्या महागड्या शस्त्रक्रिया विनामूल्य करण्यात येणार आहेत अशी माहिती चांदमल मुनोत ट्रस्टचे ट्रस्टी किशोर मुनोत, भारतीय जैन संघटनेचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य आदेश चंगेडिया व प्रशांत गांधी यांनी दिली.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एन. एस. चव्हाण, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वैजिनाथ गुरवले यांच्या सहकार्यने सदर शिबीर होणार आहे.

मोफत प्लॉस्टिक सर्जरी उपक्रमाचा गेल्या बाविस वर्षात हजारो रुग्णांना लाभ झाला आहे. प्लॉस्टिक सर्जरीअतिशय महागडी असते. हीच बाब लक्षात घेऊन या मोफत शिबिराचा उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो. स्व. शरदकुमार दिक्षित (अमेरिका) यांच्या समरणार्थ त्यांचेच शिष्य डॉ. राज लाला, सौ. ललिता लाला अमेरिकातून नगरला येतात व त्यांचे सहकारी भारती विद्यापीठाचे डॉ. अमित बसन्नवार व अहिल्यानगरच्या डॉ. मृदुला रविंद्र मुळे हे हा मानवतेचा महायज्ञ चालवत आहेत. त्यामुळे अनेकांच्या जीवनात नवीन आनंद फुलण्यास मदत होत आहे. दरवर्षी नगरसह शेजारील जिल्ह्यातील रुग्ण या शिबिराचा लाभ घेतात. या शिबिरात नगर येथील डॉ. नूतन फिरोदिया, डॉ. दीपा भळगट हे शिबीर सहप्रमुख म्हणून शिबिरात सहकार्य करणार आहेत. सुमारे २००-३०० रुग्णांची या शिबिरात मोफत तपासणी करण्याचे नियोजन आहे.

किशोर मुनोत म्हणाले, भारतीय जैन संघटनेचे मोफत प्लास्टिक सर्जरी शस्त्रक्रिया शिबिर हजारो लोकांच्या जीवनात नवीन प्रकाश आणण्याचे काम करीत आहे. या शिबिरासाठी ट्रस्टमार्फत सहकार्य करताना खूप समाधान लाभते. हस्तीमल मुनोत यांनी आचार्यश्रींची मानवसेवेची शिकवण कायम आचरणात आणली आहे. हीच शिकवण या कार्यास हातभार लावण्यासाठी प्रेरणा देत असते. यंदाच्या शिबिराचाही जास्तीत जास्त गरजूंना लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न राहील.

शिबिरासाठी रुग्ण नोंदणी व तपासणी १६ जानेवारी या वेळेस जिल्हा रुग्णालयाच्या मागील बाजूस आयुष बिल्डिंग, ताराकपूर रोड येथे होणार आहे. उर्वरित वेळात शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. जळलेल्या, भाजलेल्या, पांढरे डाग असलेल्या रुग्णांना शिबिरात सहभागी होता येणार नाही. शिबिराच्या अधिक माहितीसाठी शिबीर प्रमुख अरुण दुगड (मो. ९८२२०२७३७३), आदेश चंगेडिया (मो ९०११११५५५९९), प्रशांत गांधी (मो ८००७०७४०००) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सौ. प्रितम रांका, सौ. सुवर्णा डागा, नियोजन व्यवस्था पाहत आहेत. शिबीर सहप्रमुख म्हणून संजय गुगळे, सौ. प्रियांका चंगेडिया, महेश गुंदेचा, केतन बालदोटा, सौ. सीमा मुनोत, महेश गुगळे, अजय फिरोदिया, सौ. कविता मुनोत, सौ. अर्चना सोळंकी, रोशन चोरडिया, निखिल बोथरा, प्रतीक जगदाळे, मंगेश घोडके योगदान देत आहेत.

जानेवारीमध्ये १३ मोफत प्लॉस्टिक सर्जरी शिबिरे होत आहेत, डॉ. राज लाला मार्फत सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर आणि गोंदिया या ठिकाणी तसेच डॉ. लॅरी वानस्टाईन मार्फत पुणे, रायपूर, नाशिक, संगमनेर, जळगाव, बेळगावी आणि दिल्ली या ठिकाणी भारतीय जैन संघटने मार्फत घेत आहेत, असे शिबीर प्रमुख शशिकांत मुनोत यांनी सांगितले.

# सावेडीच्या श्री अय्यप्पा मंदिरातील ६० दिवसांच्या 'मकर वीलक्कु उत्सवा'ची १४ जानेवारीला सांगता



नगर - सावेडीतील श्री अय्यप्पा मंदिरात चालू असेलेल्या ६० दिवसांच्या मंडल मकर पूजा उत्सवाची सांगता १४ जानेवारीला मकर वीलक्कु उत्सवाने होणार असून या दिवशी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे,अशी माहिती ट्रस्टचे संस्थापक व अध्यक्ष के. के. शेट्टी यांनी दिली

दक्षिण भारतीयासह महाराष्ट्रातील भाविकांची श्रद्धा असलेले अय्यप्पाचे मंदिर केरळमधील शबरीमळा येथे असून त्या मुख्य उत्सवाचा धर्तीवर नगरमध्ये हा उत्सव साजरा केला जातो. उत्सवानिमित्त पहाटे महागणपती हवन संध्या ६ वा श्रमिकनगर मधील बालाजी मंदिर ते अय्यप्पा मंदिर अशी सावेडीतून शोभायात्रा (तालापोल्ली) काढण्यात येणार आहे. ही तालापोल्ली पाहण्यासाठी नागरिक गर्दी करतात तर मंदीर परिसर फुलांनी व दिव्यांनी सजविण्यात येतो. संध्याकाळी ७ वा. दीपआराधना करण्यात येते.

नगरमधील सावेडीतील श्री अय्यप्पा मंदिर हे अत्यंत आकर्षक असून यामध्ये अय्यप्पा स्वामी गणपती व सरस्वतीची स्वतंत्र मंदिरे आहे. या मंदिरामध्ये १६ नोव्हेंबरपासून ६० दिवसांच्या मंडल महापूजा आणि मकर विल्लकु महोत्सव प्रारंभ झाला होता त्यानिमित्ताने रोज धार्मिक कार्यक्रम होत आहे. उत्सावानिमित्त ६० दिवस दररोज पूजा पुढीलप्रमाणे होत आहे आहे. पहाटे ५.३० वा पल्लीयुनथरल नंतर निर्मल दर्शन, सकाळी ६ वा. अभिषेक गणपती होम, स. ७ वा. प्रसन्न पूजा तर नंतर स. १० वाजेपर्यंत अर्चना निरांजन व विविध पूजा तसेच संध्या. ५. ३० वा. अलंकार दर्शन नंतर दीप आराधना महाआरती पुष्पाभिषेक रात्री ८ वा. अथर्व पूजा व नंतर दर्शन अर्चना निरांजन आणि भजन व हरीवरासम नंतर महाप्रसाद होत आहे तर विशिष्ट दिवशी धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम झाले तर २७ डिसेंबरला मंडलपूजा झाली. अय्यप्पा सेवा समितीने आयोजित केलेल्या दोन महिन्यांच्या उत्सवात भाविक सहभागी झाले होते.

देवाची आरतीनंतर पुष्पभिषेक करण्यात येणार असून, भाविकांना महाप्रसाद (गोड जेवण) देण्यात येणार आहे.

यावेळी हजारो भाविक उपस्थित राहणार आहे. शेवटी हरी वरासम होऊन ६० दिवसांच्या मंडल मकर पूजा उत्सवाची सांगता होणार आहे. तरी भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अय्यप्पा सेवा समितीने केले आहे

# महाराष्ट्र प्रांतिय गुजरगौड ब्राम्हण समाजाचे ११ जानेवारी रोजी अहिल्यानगरमध्ये महाअधिवेशन

नगर - महाराष्ट्र प्रांतिय गुजर गौड समाजाचे ११ जानेवारी रोजी सकाळी ११ ते ४ या वेळेत नगरच्या टिळक रोड येथील माऊली कार्यालय येथे हे महाअधिवेशन होणार आहे.

संपूर्ण गुजर गौड समाज एकीकरण, समाजामध्ये तरुण मुलांचे विवाह समस्या, रिती रिवाजातील योग्य तो बदल व्हावा, शैक्षणिक समस्या व मदत पुण्यामध्ये समाजाचे एखादे होस्टेल त्यामुळे महाराष्ट्रातून पुणे येथे शिक्षण नोकरी करणाऱ्या समाजाच्या मुलांची सोय व्हावी यासाठी भुतपूर्व अध्यक्ष बन्सीलाल उपाध्याय (सोलापूर), अनिल जोशी (राष्ट्रीय युवा अध्यक्ष, दिल्ली), विजय तिवाडी (औरंगाबाद), संजय त्रिपाठी (मुंबई), सौ. राधा पंचारिया, सौ. विजया द्विवेदी (मुंबई), सौ. शुभदा शर्मा, अशोक उपाध्ये (अ.नगर) हे व महाराष्ट्रातील गुजर गौड ब्राम्हण समाजाचे सर्व पदाधिकारी, समाज बांधव उपस्थित राहणार आहेत.

या महाअधिवेशनाचे संयोजन अहिल्यानगरचे समाज बांधव करीत ओहत. समाजातील सर्व माता-भगिनी तसेच समाज बांधवांनी उपस्थित रहावे, असे आवाहन नगर गुजर गौड ब्राम्हण समाज अधिवेशनाच्या स्वागत समितीचे जुगलकिशोर उपाध्ये, श्रीगोपाल जोशी, प्रकाश जोशी, शिवकुमार पंचारिया, राजेश तिवाडी, प्रसन्ना तिवाडी, कैलास उपाध्याय यांनी केले आहे.

अहमदनगर लॉयर्स को.ऑप. क्रेडिट सोसायटीच्या

# व्हा. चेअरमनपदी ॲड. संदीपकुमार पाखरे तर सेक्रेटरीपदी ॲड. विनायक सांगळे बिनविरोध





नगर - अहमदनगर लॉयर्स को. ऑप. क्रेडिट सोसायटीच्या व्हाईस चेअरमनपदी महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्राप्त नोटरी पब्लिक (भारत सरकार) ॲड. संदीपकुमार पाखरे तर सेक्रेटरीपदी ॲड. विनायक सांगळे नोटरी पब्लिक (भारत सरकार) यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उपनिबंधक सहकारी संस्था नगर तालुका यांच्याकडील प्राधिकृत सहकार अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अल्ताफ शेख यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत ही बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थेचे चेअरमन ॲड. भूषण बऱ्हाटे यांच्या अध्यक्षतेखाली सेक्रेटरी पदाची निवड पार पडली. सेक्रेटरी पदासाठी ॲड. विनायक सांगळे यांचा एकमेव अर्ज आल्याने सर्वानुमते त्यांची संस्थेच्या सेक्रेटरीपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी मावळते व्हा. चेअरमन ॲड. हफिज जहागीरदार, सेक्रेटरी ॲड. वृषाली तांदळे, ॲड. अनिता दिघे, ॲड. लक्ष्मण कचरे, ॲड. नामदेव वाकळे, ॲड. रवींद्र शितोळे, ॲड. संदीप पडोळे, ॲड. चंदन बारटक्के, ॲड. संदीप काळे, ॲड. सुधीर कुलकर्णी, ॲड. रावसाहेब बर्डे आदी संचालक उपस्थित होते.

वकील बांधव सभासदांनी माझ्यावर विश्वास ठेवून व्हाईस चेअरमनपदावर काम करण्याची संधी दिली त्या माध्यमातून सभासदांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करेल असे व्हा. चेअरमन ॲड.संदीपकुमार पाखरे यांनी सांगितले

# स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त १२ जानेवारी रोजी भिंगारच्या चौण्डेश्वरी मंदिरात व्याख्यान

भिंगार - येथील स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनी ट्रस्टच्या वतीने विवेकानंद जयंतीच्या निमित्ताने १२ जानेवारी रोजी सायंकाळी ७:३० वाजता श्री चौंडेश्वरी मंदिर सरपणगल्ली भिंगार येथे व्याख्यान आयोजित केले आहे. या व्याख्यानास उपस्थित रहावे असे आवाहन प्रबोधिनी अध्यक्ष प्रमोद मुळे यांनी केले आहे.

संगमनेर येथील सीए व पतीतपावन संघटनेचे माजी महाराष्ट्र प्रांताध्यक्ष प्राध्यापक सोपानराव देशमुख यांचे स्वामी विवेकानंद समर्थ भारत या विषयावर व्याख्यान होणार आहे. देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यासह अनेक थोर पुरुषांच्या विषयावर महाराष्ट्रात व्याख्यान दिलेली आहेत, अशी माहिती सामाजिक उपक्रम समिती प्रमुख प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष शिवप्रसाद काळे यांनी दिली.

गेली २८ वर्षांपासून सामाजिक शैक्षणिक, सेवा विषयक उपक्रम प्रबोधिनीच्या वतीने राबविले जातात. यामध्ये अनेक नामवंत व्याख्यात्यांची विविध विषयांवर व्याख्याने झालेली आहेत, अशी माहिती प्रबोधिनीचे उपाध्यक्ष रुपेश भंडारी यांनी दिली.

स्वामी विवेकानंदांचे जयंतीच्या कार्यक्रमास सभासद व श्रोत्यांनी वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन संचालक मंडळाने केले आहे.

# अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमनपदी बाळकृष्ण काळे



अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहिल्यानगर व्हा.चेअरमनपदी बाळकृष्ण काळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

नगर - अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहिल्यानगर जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या या पतसंस्थेच्या व्हा. चेअरमनपदाच्या निवडीसाठी के. के. आव्हाड, कार्यालय अधिक्षक जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अहिल्यानगर यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची सभा आयोजीत करण्यात आली होती. या सभेत व्हा.चेअरमन पदी बाळकृष्ण काळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



यावेळी बोलतांना संस्थापक अध्यक्ष चेअरमन इंजि. विजयकुमार ठुबे म्हणाले की, संचालक मंडळाने पदभार स्विकारल्यापासून संचालक मंडळ एक मताने व सर्वांना विश्वासात घेवून संस्थेचा पारदर्शक कारभार करत आहे. संस्थेच्या जिल्ह्यामध्ये मुख्य कार्यालयासह आठ शाखा कार्यरत आहेत. इतरही तालुक्यामध्ये शाखा सुरू करण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे.

या प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना व्हा. चेअरमन बाळकृष्ण काळे म्हणाले की, संस्थेच्या जिल्ह्यात ५३०० सभासद असून एकुण ठेवी ४३ कोटी आहेत. त्यामधून ३० कोटीचे कर्ज वितरण केलेले आहे. संस्थेची आर्थिक स्थिती उत्तम असून समाजातील युवकांमधील उत्साह वाढीसाठी तसेच त्यांना आपल्या पायावर उभा राहण्यासाठी संस्था सदैव मदतीचा हात देण्यात तत्पर आहे. पतसंस्थेच्या ठेवी भविष्यात वाढवत असतांना समाजातील बेरोजगारी कमी करण्यामधे ही संस्थेचा मोलाचा वाटा असतो. सर्व संचालकांना बरोबर घेवून संस्था प्रगती पथावर घेउन समाजाबरोबर सामाजिक हित कसे जोपासता येईल याचा प्रयत्न केला जाईल. भविष्यात युवकांना व्यवसाय मार्गदर्शनपर कार्यक्रम राबविण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे.

यावेळी संचालक सतीश इंगळे, द्वारकाधिश राजेभोसले, ज्ञानदेव पांडुळे, राजश्री शितोळे, प्रा.किसन पायमोडे, यशवंत शिंदे, ॲड. काशिनाथ डोंगरे, ज्ञानेश्वर अनभुले, इंजि. संभाजी मते, इंजि. बाळासाहेब सोनाळे, डॉ. कल्पना ठुबे, ॲड. राजेश कावरे, निवृत्ती रोहोकले, सुनिल जाधव, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक वारकड, सहव्यवस्थापक बबनराव सुपेकर, शाखाधिकारी महेशकुमार नलवडे उपस्थित होते.

# भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी विनायक सानप यांची निवड



नगर - मुंबई येथे भ्रष्टाचार निर्मूलन समितीची बैठक राष्ट्रीय अध्यक्ष रवींद्र द्विवेदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी अहिल्यानगर जिल्ह्याच्या अध्यक्षपदी विनायक सानप यांना निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी राष्ट्रीय जनसंपर्क अधिकारी दत्तात्रेय जाधव, महाराष्ट्र अध्यक्ष बाळासाहेब इथापे, महाराष्ट्र प्रभारी तुळशीराम लुंगारे, महाराष्ट्र सचिव ज्ञानोबा चाटे, मराठवाडा अध्यक्ष मधुकर पतंगे, महाराष्ट्र दक्षता अधिकारी संजय तिखे, नितीन शिंदे, गोविंद पुंडे, अविनाश कच्छवे, रामदास बाभुळकर, प्रशांत कोळेवार आदी उपस्थित होते.

यावेळी विनायक सानप म्हणाले की, माझी भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी निवड झाली असून त्या माध्यमातून जिल्ह्यातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी उपयोजना केल्या जातील, नागरिकांमध्ये जनजागृती करत भ्रष्टाचाराला पायबंध घालण्यासाठी काम केले जाईल असे ते म्हणाले.

# सातारा येथे होणाऱ्या जागतिक मराठी संमेलनात ११ जानेवारीला डॉ. गिरीश कुलकर्णींचा सहभाग

नगर - सातारा येथे १० ते १३ जानेवारीदरम्यान होत असलेल्या जागतिक मराठी संमेलनातील परिसंवादासाठी स्नेहालयाचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी यांना निमंत्रित करण्यात आले आहे. आधारवड हा परिसंवाद ११ जानेवारी रोजी दुपारी ३:३० वाजता होईल. जागतिक मराठी अकादमी आणि रयत शिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने होत असलेल्या या संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे आहेत. ज्येष्ठ भाष्यकवी रामदास फुटाणे अकादमीचे अध्यक्ष आणि यशवंतराव गडाख हे उपाध्यक्ष आहेत.

# नगरमध्ये २६ जानेवारीला फूड फेस्टिव्हल

**स्टॉलमध्ये स्थानिक गृह उद्योजक, महिला बचत गटांना प्राधान्य : भारत भारती**

नगर - भारत भारती संस्थेच्या वतीने अहिल्यानगरमध्ये प्रजासत्ताकदिनी २६ जानेवारी रोजी हॉटेल संजोग येथे फूड स्टॉलचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्टॉलसाठी खाद्य पदार्थ बनवणाऱ्या स्थानिक गृह उद्योजक, महिला बचत गटांना प्राधान्य देण्यात येणार असून अल्प दरात ३० ते ३५ स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष कमलेश भंडारी यांनी केले आहे.

महिला अध्यक्षा विनया शेट्टी म्हणाल्या, या फूड स्टॉलमध्ये देशातील सर्व राज्यांच्या खाद्य संस्कृतीचे एकत्रीकरण होत असते. त्यामुळे नगरच्या खवय्यांना विविध राज्यांच्या स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद येथे घेता येणार आहे. या फूड स्टॉलमध्ये एका राज्याचा एकच स्टॉल असणार आहे. यासाठी स्थानिकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. स्टॉल निवडबाबत सर्व अधिकार आयोजकांकडे राखीव राहतील.

माहितीसाठी समीर बोरा ९८२२४१७७७७ रमेश रसने ९८५०४ ७७७७३.

# मधमाशा पालकांनी ऑनलाईन नोंदणी करावी

नगर - राष्ट्रीय मधुमक्षिका मंडळ (नवी दिल्ली) व महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने मधमाशा पालकांसाठी मधुक्रांती madhukranti.in/nbb या पोर्टलवर नोंदणींचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

ऑनलाईन नोंदणी करणाऱ्या मधुमाशिका पालकांना ओळखपत्र (Recognition) दिले जाईल. प्रत्येक नोंदणीकृत पालकाला १ लाख रूपयांचा विमा लाभ मिळेल व मधमाशांच्या स्थानांतरासाठी सहजसोपी प्रक्रिया राबवली जाईल.

नोंदणीसाठी आधार कार्ड, आधारशी जोडलेले बँक खाते तपशील, मधुमक्षिकापालन प्रशिक्षण प्रमाणपत्राची सॉफ्ट प्रत (आकार - २०० kb पर्यंत) व मधुमक्षिकापालकाचा मधुमक्षिका पेट्यांसमवेत फोटो (आकार -१०० kb पर्यंत) आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. मधमाशांच्या संख्येनुसार रूपये २५० ते रूपये २० हजारांपर्यंत नोंदणी शुल्क असणार आहे. संपर्कासाठी राष्ट्रीय मधमाशी मंडळ, नवी दिल्ली ०११-२३३२५२६५, २३७१९०२५, मधुक्रांती पोर्टल - Tech Support - १८००१०२५०२६ आणि महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, पुणे (०२०) २९७०३२२८.

# विद्यालयातून मिळालेल्या संस्कारातून विद्यार्थी घडतात

**डॉ.तनुजा पोळ यांचे प्रतिपादन**



वसंत टेकडी येथील डॉ. ना. ज. पाऊलबुधे विद्यालयाचा वार्षिक पारितोषिक समारंभ झाला. याप्रसंगी डॉ. तनुजा पोळ, डॉ. मंजिरी कुलकर्णी, संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक आदी ( छाया - विजय मते)

नगर - मनुष्याला सर्व गुण संपन्न नागरिक घडविणारी ही आपली शाळा असते. विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा आदर करून त्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन केले तर भविष्यात जीवनात कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही आपल्यामधील क्षमता ओळखून त्यांना योग्य दिशा देण्याचे काम शाळेतून होत असते विद्यालयातून मिळालेल्या संस्कारातून विद्यार्थी घडतात असे प्रतिपादन नगरच्या आयुर्वेदाचार्य डॉ. तनुजा पोळ यांनी केले.

## डॉ. पाऊलबुद्धे माध्यमिक विद्यालयाचा बक्षीस वितरण

डॉ.ना.ज. पाऊलबुद्धे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आयुर्वेदाचार्य डॉ. तनुजा पोळ, डॉ.मंजिरी कुलकर्णी, माजी नगरसेविका शारदा ढवन, बाळासाहेब पवार, निखिल वारे, सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, सचिव नम्रता जगधने, सरचिटणीस रामकिसन देशमुख, दादासाहेब भोईटे, साई पाऊलबुद्धे, रघुनाथ कारमपुरी, डॉ.रेखाराणी खुराणा,प्राचार्य भरत बिडवे, प्रा.आशा गावडे,बी. फार्मसीचे प्राचार्य, शैक्षणिक संकुलातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षकवृंद उपस्थित होते.

डॉ.पोळ यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना शाळेचा उद्देश काय असतो या शालेय जीवनातच आपले ध्येय ठरवावे त्यासाठी सातत्य महत्त्वाचे असते शिक्षणाबरोबरच मैदानी खेळ महत्त्वाचे आहे. त्यामुळे आपली शारीरिक क्षमता वाढण्यास मदत होते.

डॉ. मंजिरी कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर गरजेपुरता करावा, आरोग्यावर त्याचे काय दुष्पपरिणाम होतात हे सांगून मोबाईलचे गुलाम होऊ नका, ध्येयावर लक्ष केंद्रित करा, मोबाईलच्या अधीन न होता स्वतःवर नियंत्रण ठेवा.७ दिवसा पैकी एक दिवस तरी मोबाईल स्वतःपासून दूर ठेवावा. असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रास्तविकात प्राचार्य भरत बिडवे यांनी विद्यालयाचा प्रगतीचा अहवाल सांगितला. शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाची माहिती दिली. आर.ए. देशमुख, दादासाहेब भोईटे यांनी मार्गदर्शनपर भाषणे केली.

सूत्रसंचालन प्रा. दीपक परदेशी, यांनी केले. तर प्रा. रोहिदास चौरे यांनी आभार मानले.

